

दैनिक
# आरंभ मराठी
www.arambhmarathi.com

स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक २०२५
स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीची सर्वपक्षीय इच्छुकांकडून तयारी

पेज 4

वर्ष 2 रे ■ अंक 169 ■ मंगळवार,दि. 29 जुलै 2025 ■ RNI NO -2023/90078 ■ पाने 04 ■ किंमत रू 5


### आयोजकांना जाब विचारला, पण मतदारांनी कुणाला जाब विचारायचा ?

# डॉ.सावंत आता बॅनरवरूनही उतरले, समर्थक आक्रमक

### शिवसेनेतील धुसफूस चव्हाट्यावर, दुराव्याचे कारण, डॉ. सावंत यांची मतदारसंघातील अनुपस्थिती

**आरंभ मराठी | धाराशिव**

नोव्हेंबरमध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीनंतर पुण्याला गेलेले शिवसेनेचे माजीमंत्री डॉ.तानाजी सावंत परत आलेच नाहीत.त्यामुळे स्थानिक प्रश्न समजून घेण्यासाठी लोकप्रतिनिधी उपलब्ध नसल्याने मतदार नाराज आहेत. तर पदाधिकाऱ्यांचाच दुसरा गटही त्यांच्यावर नाराज आहे.त्यामुळेच पक्षाच्या कार्यक्रमाच्या बॅनरवरून डॉ.सावंत यांचे फोटो हटविण्यात येत आहेत. सोमवारी मात्र या बॅनरवरील फोटोसाठी डॉ.सावंत समर्थकांनी आक्रमक पवित्रा घेतला. त्यानंतर बॅनरवर डॉ.सावंत यांचा फोटो घेण्यात आला. पक्षातील समर्थकांनी फोटोसाठी आयोजकांना जाब विचारला,मात्र मतदारसंघातील जनतेने आपल्या प्रश्नांसाठी कुणाला जाब विचारायचा, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

धाराशिव जिल्ह्यात शिवसेनेमध्ये (शिंदे गट) अंतर्गत विसंवाद गडद होत आहे. भूम-परांडा विधानसभा मतदारसंघाचे आमदार आणि राज्याचे माजी आरोग्यमंत्री डॉ. तानाजी सावंत सध्या पक्ष आणि मतदारसंघ या दोन्ही पातळ्यांवरून अलिप्त झाल्याचे चित्र आहे. डॉ.सावंत हे या मतदारसंघातून सलग दुसऱ्यांदा निवडून आले असले, तरी यावेळी त्यांचा विजय फारच कमी मताधिक्याने झाला. त्यांच्या मनात याबद्दल प्रचंड नाराजी आहे. त्यातच महायुती सरकारमध्ये त्यांना पुन्हा मंत्रीपद मिळाले नाही, ही खंत त्यांच्यात स्पष्ट दिसते. त्याचा परिणाम म्हणजे निवडणुकीनंतर ते आजवर एकदाही मतदारसंघात फिरकलेले नाहीत, तसेच पक्षाच्या कोणत्याही जाहीर कार्यक्रमात दिसलेले नाहीत.काही समर्थक त्यांच्या आरोग्याचे कारण सांगत असले तरी ८ महिने हे कारण पटण्याजोगे नाही. त्यांच्या या निष्क्रियतेमुळे कार्यकर्त्यांमध्ये मोठी अस्वस्थता निर्माण झाली आहे. डॉ. सावंत यांच्यावर निष्ठा असलेल्या कार्यकर्त्यांनीही आपली नाराजी व्यक्त करायला सुरुवात केली आहे.साहेबांनी एकदा तरी मतदारसंघात येऊन जायला हवे, अशी भूमिका समर्थकही मांडतात. सोमवारी पक्षाची आढावा बैठक तीन मतदारसंघात घेण्यात आली.यासाठी समन्वयक राजन साळवी जिल्ह्यात आले होते. या बैठकीच्या बॅनरवर डॉ.सावंत यांचा फोटो लावण्यात आला नाही. यावरून सावंत समर्थक गट भडकला. दुसऱ्या गटाने संयमाने भूमिका घेत बॅनरवरील फोटोमध्ये दुरूस्ती केली. मात्र, जो लोकप्रतिनिधी जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीला, स्थानिक मतदारांच्या समस्या जाणून घ्यायला, पक्षाच्या बैठकीला येत नाही, त्यांचा केवळ बॅनरवर फोटो असून काय फायदा. यावर समर्थक तरी बोलणार आहेत का, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

#### पदाधिकाऱ्यांना नवनेतृत्वाचा शोध

सोमवारी बॅनरवरून घडलेली ही घटना छोट्या प्रमाणात असली, तरी तिचा राजकीय अर्थ मोठा आहे. काही वर्षे धाराशिव आणि सोलापूर जिल्ह्यातील शिवसेनेवर पकड निर्माण केलेले डॉ.सावंत यांनी दोन्ही जिल्ह्याकडे पाठ फिरवल्याने एक गट त्यांचे नेतृत्व अमान्य करत नव्या नेतृत्वाच्या दिशेने वाटचाल करतोय. शिवसेना शिंदे गटात त्यांच्याऐवजी दुसऱ्या चेहऱ्याची मागणी जोर धरू लागली आहे.

#### निवडणुकीवर परिणाम होणार

वास्तविक पाहता, डॉ. सावंत यांची नाराजी समजण्यासारखी असली तरी त्यांचा फटका सध्या भूम-परांडा मतदारसंघाला बसत आहे. विकासकामे रखडली आहेत, कार्यकर्त्यांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली आहे. तसेच पक्षाच्या पदाधिकाऱ्यांचा जनतेशी संपर्क तुटत आहे. आगामी काळात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका असून, या पार्श्वभूमीवर ही स्थिती धोक्याची घंटा ठरू शकते. नेतृत्वाचेच चित्र धूसर असेल तर 'ग्राउंड लेव्हल'वर निवडणूक कशी लढायची, असा प्रश्न कार्यकर्त्यांमध्ये विचारला जातोय.

#### सोलापुरातही बॅनरवरून वगळले

डॉ.तानाजी सावंत यांना धाराशिव जिल्ह्यातच नव्हे तर त्यांचे गाव असलेल्या सोलापूर जिल्ह्यानेही नाकारण्यास सुरूवात केली आहे. दोन महिन्यांपूर्वी पक्षप्रमुख तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत डॉ.तानाजी सावंत यांचे बंधू प्रा.शिवाजीराव सावंत यांनी माढा येथे कार्यक्रम आयोजित केला होता. या कार्यक्रमाच्या निमंत्रण पत्रिकेपासून बॅनरपर्यंत कुठेही डॉ.तानाजी सावंत यांचे फोटो, नाव घेतले नव्हते.

# धाराशिवकरांनो, तुमच्या अमर्याद सहनशक्तीला पुन्हा एकदा सलाम!



एका मागास जिल्ह्याचा दर्जा सात वर्षांपूर्वी नीती आयोगानं दिला, पण परिस्थितीत फरक किती पडला? शून्य! रस्त्यांवर खड्डे आहेत की खड्ड्यांत रस्ते, हेच कळेनासं झालंय. रात्री पथदिवे बंद आणि दिवसाढवळ्या प्रशासन झोपेत.
कचऱ्याचे ढीग शहरात 'विकास' दाखवत उभे आहेत.
पण तुम्ही शांत... फारच शांत! अधिकारी काम करत नाहीत, व्यवस्था कुचकामी आहे हे सगळं माहिती असूनही तुम्ही ''बरंय, सहन करू...'' म्हणत राहता.कोणालाच जाब विचारायचा नाही, आरडाओरडा करायचा नाही, आंदोलन नाही फक्त सहन करायचं! म्हणूनच धाराशिवकरांनो, 'नोबेल शांतता पुरस्कार'साठी तुमचं नाव सुचवावं लागतंय! कारण विकास हवा असेल तर आवाज उठवावा लागतो, पण इथे 'सहनशीलता' म्हणजे शौर्य समजलं जातंय. खरं म्हणजे ही सहनशक्ती 'संताप' बनायला हवी होती, पण वाट बघत बसणाऱ्यांना काय मिळतं, हे इतिहासाने अनेकदा दाखवलंय. सहन करायचं, सहन करत राहायचं, शेवटी पूर्णपणे विसरलेलं धाराशिवच उरायचं! कधी तरी ही सहनशक्ती उसळून बाहेर येईल अशी आशा आहे... पण तोपर्यंत, पुन्हा एकदा सलाम तुमच्या संयमाला!

## दोन बालकांचा तलावात बुडून मृत्यू
### शिवाजी नगर तांड्यावरील दुर्घटना

**आरंभ मराठी | दाळींब**

तलावातील पाण्यात बुडून ७ आणि ८ वर्षांच्या दोन बालकांचा मृत्यू झाल्याची घटना उमरगा तालुक्यातील दाळिंबच्या शिवाजी नगर तांड्यानजीक सोमवारी सायंकाळी साडेचार वाजेच्या सुमारास घडली. या घटनेने परिसरात खळबळ व्यक्त होत आहे. शिवाजी नगर तांड्यातील तलावालगत असलेल्या आपल्या शेतात शेतकरी खुरपणीसाठी गेले होते.दरम्यान सुशांत बाळू चव्हाण (वय ७ वर्षे) व प्रमोद प्रकाश चव्हाण (वय ८ वर्षे) हे दोघे चुलत भाऊ खेळत होते.शेतात खुरपणीच्या कामात गुंतलेल्या शेतकऱ्यांची ही दोन मुले शेतात खेळत खेळत तलावाजवळ गेली आणि पाय घसरून पडल्याने त्यांचा मृत्यू झाला.बराच वेळ ही मुले दिसेनाशी झाल्याने नातेवाईकानी शोध घेण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर त्यांना मुले पाण्यात पडल्याचे दिसले. त्यांना पाण्यातून काढून दाळिंब येथिल खाजगी दवाखान्यात नेले असता डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. त्यानंतर पोलिस पाटील अश्विनी वाले यांनी मुरुम पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक संदीप दहीफळे यांना खबर दिल्याने तात्काळ घटनास्थळी भेट देऊन घटनेची माहिती घेऊन येणेगूर प्राथमिक आरोग्य केंद्रात त्यांच्यावर उत्तरीय तपासणी करून रात्री उशिरा नातेवाईकांच्या ताब्यात मृतदेह देण्यात आले.या घटनेमुळे सर्वत्र हळहळ व्यक्तकेलीजातआ

## निधीअभावी काम रखडले, कंत्राटदार आर्थिक अडचणीत
### जिल्ह्यातील कंत्राटदारांचे प्रशासनाला निवेदन

**धाराशिव–** जलजीवन मिशन अंतर्गत केलेल्या कामाचे देयक शासनाकडून न मिळाल्यामुळे सांगली जिल्ह्यातील हर्षल पाटील यांनी आत्महत्या केली. या घटनेमुळे राज्यभरातील जलजीवन मिशन आणि सार्वजनिक बांधकामाशी संबंधित कंत्राटदारांमध्ये तीव्र संताप उसळला आहे. या पार्श्वभूमीवर धाराशिव जिल्हा कंत्राटदार संघटनेने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने करत शासनाच्या उदासीन धोरणाचा तीव्र निषेध नोंदवला.तसेच प्रशासनाला निवेदन देण्यात आले.यासंदर्भात दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, निधीअभावी अनेक योजना अर्धवट स्थितीत थांबल्या असून, कंत्राटदार प्रचंड आर्थिक अडचणीत सापडले आहेत. शासनाचे दुर्लक्ष आणि वित्तीय अनास्थाच हर्षल पाटील यांच्या आत्महत्येस जबाबदार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.गेल्या आठ महिन्यांपासून जलजीवन मिशनच्या निधीचे वितरण न झाल्यामुळे, अनेक योजनांचे काम रखडले आहे आणि कंत्राटदारांचे कोट्यवधींचे देयक थकीत आहेत. या संकटात, त्यांनी बिलातून कपात केलेली व रोखीने भरलेली सुरक्षा ठेव तात्पुरती परत द्यावी, अशी मागणी केली आहे. तसेच, ग्रामपंचायतींकडून वसूल होणारी १०% लोकवर्गणी कंत्राटदारांच्या बिलातून कपात केली जात आहे, जी अन्यायकारक असल्याचे सांगत ही कपात त्वरित थांबवण्याची गरज त्यांनी मांडली.यावेळी भारत इंगळे,के.डी.घोडके,प्रशांत रणदिवे,अमोल गरड,संजय जेवळीकर,मुन्ना वाडकर,मधुकर मेटे,अमित शिंदे,अनिकेत कोळगे,लखन गायकवाड,तात्या भोईटे,अनिल शेळके,प्रवीण यादव,इरशाद शेख,महेश सोनटक्के,सुदर्शन पुराणिक,अनिकेत कामटे,यशपाल गायकवाड,अजय भोसले, आदी उपस्थित होते.

## पवनचक्की कंपनीविरोधात शेतकऱ्यांचे पुन्हा उपोषण

**धाराशिव–**वाशी तालुक्यातील शेतकऱ्यांची पवनचक्की कंपनीकडून आर्थिक फसवणूक होत असल्याचा आरोप करत शेतकऱ्यांनी दोन कंपनीविरोधात पुन्हा एकदा उपोषणाचे हत्यार उपसले आहे. सोमवारी (दि.२८) वाशी तालुक्यातील तांदुळवाडी, पिंपळवाडी, सारोळा (मांडवा) आणि दहिफळ या चार गावातील तसेच भूम तालुक्यातील सोनेवाडी या गावचे पन्नास ते साठ शेतकरी पवनचक्की कंपनीच्या विरोधात तक्रार करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात आले होते. मागील महिन्यात देखील या शेतकऱ्यांनी त्यांच्या मागण्यांसाठी सात दिवस उपोषण केले होते. त्यावेळी चार दिवसात आपल्या मागण्यांवर तोडगा काढून सकारात्मक निर्णय घेतला जाईल असे आश्वासन मिळाल्यानंतर शेतकऱ्यांनी सातव्या दिवशी उपोषण मागे घेतले होते. मात्र, एक महिना झाला तरी मागण्या मान्य न झाल्यामुळे शेतकऱ्यांनी आंदोलन करण्याचा निर्णय घेतला. मागील आंदोलनावेळी शेतकरी, कंपनीचे प्रतिनिधी आणि प्रशासकीय अधिकारी यांची एक कमिटी नेमून शेतकऱ्यांच्या मागणीवर निर्णय घेण्याचे ठरवले होते. त्यानुसार सोमवारी कमिटीची बैठक होती. त्यापूर्वीच शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांची भेट घेऊन मागण्यांचे निवेदन त्यांना सादर करून उपोषण करणार असल्याचे सांगितले. यावर जिल्हाधिकारी पुजार यांनी शेतकऱ्यांना कमिटीची बैठक घेऊन सकारात्मक निर्णय होईल अशी आशा व्यक्त केली होती.बैठकीला सेरेंटिका कंपनीचे प्रतिनिधी आले मात्र रिनिवल कंपनीचे प्रतिनिधी आले नाहीत.

# प्रतिकूल हवामानामुळे पावसाचा पंधरा दिवस पुन्हा खंड;बळीराजाची चिंता वाढणार

### दोन महिन्यात सरासरीच्या फक्त ९७ टक्के पाऊस

**आरंभ मराठी | धाराशिव**



यावर्षी मे महिन्यातच मुसळधार बरसलेला पाऊस जून आणि जुलै महिन्यात मात्र अनियमितपणे बरसला. त्यामुळे बळीराजाची घालमेल सुरू झाली आहे. धाराशिव जिल्ह्यात तब्बल ४० दिवस पावसाने विश्रांती घेतल्यानंतर २२ जुलै पासून पुन्हा पावसाचे आगमन झाले. मागील पाच दिवसात पडलेल्या संततधार पावसाने बळीराजाला दिलासा दिला. मात्र, आता पुन्हा एकदा पंधरा दिवसांसाठी पाऊस विश्रांती घेणार असल्याचे दिसून येत आहे. पुढील दोन आठवडे पावसासाठी वातावरण प्रणाली अनुकूल नसल्यामुळे १० ऑगस्ट पर्यंत मोठ्या पावसाची शक्यता दिसत नाही. स्थानिक वातावरण निर्मिती होऊन काही भागात हलक्या पावसाच्या सरी बरसण्याची शक्यता आहे. मात्र, हा पाऊस हलक्या स्वरूपात असेल. व्यक्त केलेल्या अंदाजानुसार पावसात खंड पडला तर फुलोऱ्यात आलेल्या सोयाबीनला त्याचा फटका बसू शकतो. जून आणि जुलै महिन्यात जिल्ह्यात सरासरीपेक्षा कमी पाऊस पडला. जून महिन्यात धाराशिव जिल्ह्यात सरासरी १२७ मिमी पाऊस पडतो. परंतु, जून महिन्यात केवळ ९८ मिमी पाऊस पडला. हा पाऊस सरासरीच्या केवळ ७८% म्हणजे अतिशय कमी होता. जून महिन्यात केवळ तुळजापूर, उमरगा आणि लोहारा या तीन तालुक्यातच १००% पाऊस पडला. जुलै महिन्यात पहिले तीन आठवडे कोरडे गेल्यानंतर या आठवड्यात सर्वदूर दमदार पाऊस पडला. जुलै महिन्यात जिल्ह्यात सरासरी ११९ मिमी पाऊस पडतो तर आतापर्यंत १४१ मिमी पाऊस पडला आहे. हा पाऊस सरासरीच्या ११८% पडला. त्यामुळे जुनपेक्षा जुलै महिना बळीराजासाठी समाधानकारक गेला. जून व जुलै या दोन महिन्यांचा विचार करता जिल्ह्यात सरासरी २४६ मिमी पाऊस पडतो. मात्र, आतापर्यंत केवळ २३९ मिमी एवढाच पाऊस पडला आहे. हा पाऊस सरासरीच्या केवळ ९७% आहे. पावसाची दोन महिन्यातील ही आकडेवारी दुष्काळाची चाहूल देणारी आहे. मे महिन्यातील २९८ मिमी पावसामुळे जिल्ह्यातील जलाशयात पुरेसा पाणीसाठा झाला आहे. परंतु, ऐन पावसाळ्यात पडलेला पाऊस आतापर्यंत समाधानकारक पडलेला नाही. ऑगस्ट महिन्यात पहिले पंधरा दिवस पावसाचा खंड असला तरी पुढील पंधरा दिवसात मात्र मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता व्यक्त करण्यात आलेली आहे. सोयाबीन सारख्या पिकांना आतापर्यंत संजीवनी मिळाली असली तरी ऊसासारख्या बागायती पिकांना दमदार पावसाची अजूनही प्रतीक्षा आहे. जून आणि जुलै महिन्यातील पावसामुळे जलाशयातील वाढ देखील किरकोळ झालेली आहे. दरवर्षी ऑगस्ट महिन्यात सर्वत्र मुसळधार पाऊस पडतो. परंतु, यावर्षी १० ऑगस्ट पर्यंत मुसळधार पावसाची शक्यता कमी आहे. काही भागात हलक्या सरी पडू शकतात.

#### १० ऑगस्ट पर्यंत पावसाची शक्यता कमी

बंगालच्या उपसागरात निर्माण झालेले कमी दाबाचे क्षेत्र जमिनीवर आले आहे. पुढे ते पश्चिम दिशेने प्रवास करत मध्य प्रदेशात गेले आहे. मध्य प्रदेशातील अंतर्गत भागात आल्यानंतर त्याची तीव्रता कमी झाली आणि ते उत्तर दिशेला सरकत गेले. यापुढे बंगालचा उपसागर आणि अरबी समुद्र या दोन्ही समुद्रात कोणत्याच हालचाली नाहीत. यामुळे पुढील आठ ते दहा दिवस म्हणजेच १० ऑगस्ट पर्यंत कुठलीच हवामान प्रणाली विकसित होणार नाही अशी शक्यता आहे. मात्र, धाराशिव जिल्ह्यात स्थानिक वातावरण निर्मिती होऊन काही भागात हलका ते मध्यम पाऊस होईल असा अंदाज आहे. हा पाऊस मोजक्याच ठिकाणी अगदी हलक्या स्वरूपात पडू शकतो. ऑगस्ट महिन्याचा पहिला आठवडा पूर्णपणे खंड स्वरूपात जाण्याची शक्यता आहे. १० ऑगस्ट रोजी अरबी समुद्रात केरळ च्या किनारपट्टीला कमी दाबाचे क्षेत्र विकसित होईल अशी शक्यता आहे. जर हे क्षेत्र प्रभावी बनले तरच महाराष्ट्राच्या दक्षिण भागात १० ऑगस्ट ते १२ ऑगस्ट या कालावधीत हलका ते मध्यम तर काही ठिकाणी जोरदार पाऊस होण्याची शक्यता आहे. ऑगस्टमध्ये समाधानकारक पाऊस पडणार आहे. फक्त पहिले दहा दिवस पाऊसाची शक्यता कमी आहे.

**सुरज जयपाल जाधव**
हवामान अभ्यासक.

## महाराष्ट्र ग्रामीण बँकेवर दरोडा; २५ लाख रुपये रोकड असलेली तिजोरी फोडण्याचा प्रयत्न

**आरंभ मराठी | परंडा**

परंडा शहरातील महाराष्ट्र ग्रामीण बँकेवर दरोडेखोरांनी दरोडा टाकून गॅस कटरच्या साह्याने तिजोरीतील रक्कम चोरण्याचा प्रयत्न केला. ही घटना सोमवारी (दि.२८) सकाळी उघडकीस आली. याबाबत अधिक माहिती अशी की, परंडा पोलीस ठाण्याच्या पाचशे फुटाच्या अंतरावर असलेल्या शहरातील महाराष्ट्र ग्रामीण बँकेची पाठीमागे लोखंडी खिडकी गॅस कटरच्या सहाय्याने कट करून दरोडेखोरांनी बँकेत प्रवेश केला. तसेच लोखंडी तिजोरी गॅस कटरच्या सहाय्याने तोडण्याचा प्रयत्न केला. मात्र, तिजोरीचे लॉक न निघाल्यामुळे दरोडेखोर रिकाम्या हाताने फरार झाल्याने चोरीचा डाव फसला. या तिजोरीमध्ये २५ लाख रुपये होते अशी माहिती बँकेच्या अधिकाऱ्यांनी दिली. याप्रकरणी परंडा पोलिसांनी घटनास्थळाची पाहणी करून पंचनामा केला. तालुक्यात घडत असलेल्या दरोडे, चोरी, वाटमारी यामुळे व्यावसायिक, बँक कर्मचारी तसेच व्यापाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण तयार झाले आहे. तिजोरी तोडत असताना सीसीटीव्ही कॅमेऱ्यावर कापड टाकून गॅस कटरच्या साह्याने तिजोरी फोडण्याचा प्रयत्न केला. मात्र, तिजोरीचे लोखंड जाड असल्यामुळे तिजोरी तुटली नाही व लॉकही निघाले नाही. यामुळे तिजोरीतील २५ लाख रुपये वाचले अशी माहिती बँक मॅनेजर यांनी दिली.

## बलात्कार करून महिलेचे पाच लाखांचे दागिने केले लंपास

**आरंभ मराठी | भूम**

लग्नाचे आमिष दाखवून महिलेवर बलात्कार करून महिलेचे तब्बल पाच लाख रुपयांचे सोन्याचे दागिनेही आरोपीने लंपास केल्याची धक्कादायक घटना भूम तालुक्यातील एका गावात घडली. यासंबंधी सविस्तर वृत्त असे की, भूम तालुक्यातील एका गावातील ३५ वर्षीय महिलेवर २४ नोव्हेंबर २०१७ पासून २२ जुलै २०२५ पर्यंत लग्नाचे आमिष दाखवून एका व्यक्तीने आठ वर्षे लैंगिक अत्याचार केला. या काळात ती महिला घरी एकटी असताना गावातील एका तरुणाने तिला लग्नाचे अमिष दाखवून तिला वेगवेगळ्या ठिकाणी घेवून जावून तिच्यावर बळजबरीने लैंगीक अत्याचार केला. तसेच आरोपी तरुणाने आय. टी. आय. भुम येथे घेतलेल्या जमीनीत तुला हिस्सा देतो असे म्हणून पीडित महिलेकडून विश्वासाने ५ लाख १९ हजार ३७० रुपये किंमतीचे १४९ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने घेवून तिला ते परत न करता तिची फसवणुक केली. पिडीत तरुणीने दिनांक २७ जुलै रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा.न्या. सं.कलम-६९, ३१८(२) अन्वये आरोपी तरुणावर गुन्हा नोंदवला आहे. पोलीस पुढील तपास करत आहेत.

CMYK

# फेसबुक..असं एक माध्यम



**सर्वच** माध्यमातून वाईट दाखवल्या जातात, पण आपल्याला काय पाहिजे ते घ्यावे. मला या माध्यमातून ३६ वर्षानंतर माझी नातेवाईक सापडली. जीवनातील वेळ काळ अशी येत असते की,एखाद्याची ओळख कधी कुठे होईल याचा नेम नसतो.बरं,ओळख झाली ! एखादा भेटला परत भेटेल की नाही याची गॅरंटी नसते.तेच माझ्या बाबतीत घडले.ओळखण्याचा योग असेल तर माध्यम कोणतेही असू शकते. मी असाच वेळ होता म्हणून मोबाईल वर फेसबुक हे माध्यम पाहत होतो!अन, तेवढ्यात मेसेज बॉक्स एक मेसेज आला.तुम्ही पुण्यात घोरपडी घोरपडीला होता का ?'! असा मेसेज आला.तो एक महिलेचा होता.मला वाटले कोण केला असेल? कारण ओळखीचं कोणी वाटत नव्हतं,म्हणून मी त्याच्याकडे कानाडोळा केले,डोक्याला कामचं लागलं.नाही तो ताप ,खुराक.. परत दुसऱ्या दिवशी मेसेज आला. मी तुम्हाला कुठं तरी पाहिलंय!पूर्वी तुम्ही पुण्याला होता का ?असा मेसेज तिने टाकला. मी एक मेसेज केला, मला ओळख लागत नाही ,तुमचे नाव सांगा ! पलीकडून लगेच उत्तर आलं.मी संगिता चाकूरकर मी डोक्यातील डिक्शनरी व फसबुक वरील फ्रेंड लिस्ट चाळली, परंतू माझ्या लिस्टमध्ये या नावाची महिला कोणी नव्हती.मला काही आठवलं नाही .एक तर महिला, त्याबाबत रिस्क कोणघ्या.!असं म्हणून मी टाळलो. पण ती काही माझा पिच्छा सोडत नव्हती.परत तिचा मेसेज आला, तुम्हीसोमनाथ मामा का!? मी मुन्नी नारायणपूरे मग माझी टुब लाईट पेटली अन झटकन ३६ वर्ष मागे गेलो हो,हो,ओळखलं!मावशीची मुलगी मुन्नी का?!' (तिच्या आईला मी मावशी म्हणायचं) ३६ वर्ष इतक्या वर्षानंतर ही तिनं मला ओळखलं होतं. ( फेसबुक वर माझं फोटो पाहुन ) त्यावेळी ती दहा वर्षाची होती ,आम्ही पुण्यात घोरपडी भागात शेजारी शेजारी रेल्वे कॉलनी मध्ये भाड्याने रहात होतो.माझे मोठे बंधू रेल्वे लोकोशेड येथे नोकरीस होते. त्यावेळेच्या व आत्ताच्या चेहरापट्टीत ( दोघांच्या)बराचफरक पडला होता. त्यावेळी ती लहान पोलक्यात होती मी तुझा फोन नंबर दे !असा मेसेज केला.मग मुन्नीने नंबर दिला.फोन केल्यावर ती दोन तास बोलत होती.मी विचारले, मावशी,कशी आहे!,ती म्हणाली आई,परवाच वारली!,खूपच वाईट झाले,कारण आम्ही बरेच वर्ष जवळ एकत्र रहात होतो.जवळच्या जिल्हा ते लातूर चे.असल्याने फार जिव्हाळ्याचे संबंध होते.मी तिला विचारले,'' लग्न झाले का?!' ती,हो झाले तीन लेकराची आई आहे !' दोन मुली,एक मुलगा आहे.'! मी ,कोठे दिले आहे ती –,बेलुरे यांच्या घरात,! चाकुरमध्ये दिले आहे.!. मालक शिक्षक आहेत,खूप सुखी आहे,पण ,आई नाही बघण्यासाठी.. जाऊ दे,जादा कष्टी होऊ नको,!तिचं आयुष्य तेवढचं,! मी तिला म्हणालो. पुण्यात असताना मावशीने माझ्या कामासाठी बरेच प्रयत्न केले होते. पण, नंतर पुण्यातून मी गावाकडे आलो.त्यानंतर कोणताच संपर्क झाला नाही.सध्या मुन्नी, लातुरात स्थायिक झाली आहे.आता ती नातेवाईक आहे. परवा तिनं मला फोन केला,मामा, माझ्या मुलीचं लग्न जमले आहे,तुम्ही या ! लग्न लातूरला आहे.!' जावई, परदेशात असतो.! मुलगी पण तिकडेच जॉब करते ! मी त्या लग्नाला गेलो.३६ वर्षांनी प्रत्यक्षात भेट होत होतो, काय,मामा प्रत्यक्ष किती वर्षांनी भेटतो आहे,ते पण या फेसबुक मुळे! असं म्हणून ती खळखळूनहसत होती. तिला खूप आनंद झाला होता.मी नव वरवधूस शुभाशीर्वाद दिले,पुढील वाटचालीस शुभकामना.कधी कधी वाटतं की,' फेसबुक हे फक्त करमणूक,मनोरंजनाचे साधन, माध्यम पण,आपली माणसं शोधण्याचं ,भेटण्याचं एक उत्तम दुवा आहे. आता अनेक सुविधा,साधने ,माध्यम निर्माण झाली आहेत. त्यात एक माध्यम म्हणजे फेसबुक...यामध्ये सर्व माहिती ,मित्र परिवार, अनोळखी माणसे ,विविध क्षेत्रातील कलादर्शन पाहण्यात येते. किवा कोणास निरोप ,माहिती द्यायची असेल तर सगळ्यात सोपे काम आहे .त्यात काही वाईट प्रवृत्तीची पण असतात. ते त्यातून काय घ्यायचे ते आपण ठरवावे. यातून पै,–पाहुणे ,मित्र परिवार शी ओळख, संवाद होत असतो. त्यातूनच एक ३६ वर्षापूर्वीची ओळखीची ओळख झाली , धन्यवाद फेसबुक..



**सोमनाथ बेलुरे**
धाराशिव
मो.९८५००३६६४६

# गाडी चालविताना मोबाईलवर बोलणं गरजेचं असते का ?

**आजच्या** काळात मोबाईल माणसाच्या जीवनाचा अविभाज्य भाग बनला आहे.मोबाईलवर अनेक महत्त्वाची कामे केली जातात.त्यामध्ये एकमेकांना निरोप देणे,संवाद साधणे,फोटो व कागदपत्रे पाठविणे,बँक व्यवहार करणे, मनोरंजन,खेळ इत्यादी कामांचा समावेश होतो. संपूर्ण जग मोबाईलच्या माध्यमातून हातात आले असले तरी माणसाला उपयोगी असणारा मोबाईल कधीकधी काळ बनून संकट घेऊन उभा राहतो.सोशल मिडियाचा वाढता वापर यामुळे माणसाच्या जीवनातील निवांतपणा व शांतता हरवत चालली आहे. कोणतेही वाहन मग ते दुचाकी अथवा चारचाकी असो ते चालविताना मोबाईलवर बोलू नये असा नियम आहे. पण माणसांना नियम मोडण्यात आनंद आणि मोठेपणा वाटतो.अशा वागण्यामुळे अपघात होऊन स्वतः बरोबर इतरांच्या जीवाला धोका होऊ शकतो याची जाणीव असूनही माणसे बिनधास्तपणे वाहन चालविताना मोबाईलवर बोलतात. या जगात सर्वात अनमोल काय आहे तर आपला जीव.हे माणसांच्या लक्षात कसे येत नाही याचे नवल वाटते.असा काय इतका महत्वाचा फोन असतो की गाडी चालविताना तो घेतलाच पाहिजे.नाही घेतला तर मोठे आभाळ कोसळेल.हे कळत असले तरी फोन आल्यावर माणसे एका हाताने गाडी चालवितात आणि दुस–या हाताने कानाला मोबाईल लावून बोलतातच.यामध्ये चांगले शिकलेले आणि स्वतः ला सुशिक्षित म्हणवणारे लोकच जास्त असतात. तुम्हाला मोबाईलवर बोलणं खूपच महत्वाचे व अत्यंत तातडीचे असेल तर गाडी रस्त्याच्या बाजूला घ्या मोबाईलवर निवांत बोला आणि मग पुढचा प्रवास करा.पण माणसाला थांबायला वेळ नाही. मोबाईलवर बोलताना लक्ष विचलित होते. वाहनावरील नियंत्रण गमाविल्यामुळे अपघात होतात.मोठ्या संख्येने माणसे दगावतात.वाढती लोकसंख्या आणि रस्त्यावरील वाहनांची प्रचंड संख्या यामुळे सुरक्षित प्रवास करणं अवघड बनलं आहे.याला माणसांची बेपर्वाई कारणीभूत आहे.प्रत्येक व्यक्तीने स्वयंशिस्त पाळून वाहतुकीचे नियम पाळले पाहिजेत.तरच माणसांचे जीव वाचतील.प्रवास सुखकर आणि आनंददायी होईल. गाडी चालविताना मोबाईलवर बोलणं म्हणजे मृत्यूला निमंत्रणच होय.आपल्या छोट्याशा चुकीमुळे इतरांचे आणि आपल्या माणसांचे जीवन आपणच अंधकारमय करुन ठेवतो.माणसं जीवाची पर्वा न करता नियम मोडण्यात आनंद मानतात.आणि जीव गमावून बसतात. कोणतेही गॅझेट आपल्यासाठी आहेत.आपण त्यांच्यासाठी नाही.त्यामुळे गाडी चालविताना मोबाईल न वापरता स्वतः बरोबर इतरांच्या जीवाची काळजी घेऊन जबाबदार नागरिक म्हणून भूमिका पार पाडूयात.

**लक्ष्मण जगताप**
बारामती

# जीवन म्हणजे क्रिकेट राजा!

**मानवी** जीवनाला जितक्या उपमा देता येतील, त्या सर्व कमीच ठरतात. जीवन हे प्रत्येकासाठी वेगळं, तरीसुद्धा एक समान खेळासारखंच असतं. क्रिकेट या लोकप्रिय खेळाशी जीवनाची तुलना करणं हे एक फारच बोलकं रूपक आहे. महान क्रिकेटपटू सुनील गावस्कर यांनी ''हे जीवन म्हणजे क्रिकेट राजा!'' हे गाणं १९७९ मध्ये गायलं होतं. शांताराम नांदगावकर यांनी या गीताचे बोल लिहिले असून, गौतम गिरीष यांनी त्याला संगीत दिलं आहे. आजही कधीमधी हे गीत रेडिओवर वाजताना कानावर पडतं आणि आयुष्याकडे पाहण्याचा एक नवा दृष्टिकोन मिळतो. सुनील गावस्कर, ज्यांना ''लिटिल मास्टर'' म्हणून ओळखलं जातं, यांनी फलंदाज म्हणून भारतीय क्रिकेट संघात अपूर्व योगदान दिलं आहे. त्यांच्या फलंदाजीतील संयम, चातुर्य आणि कष्ट आजही आदर्श मानले जातात. त्यांनी गायलेल्या या गाण्याच्या माध्यमातून त्यांनी मानवी जीवनाचं सारच क्रिकेटशी जोडून मांडलं आहे.क्रिकेट हा खेळ अनिश्चिततेचा समजला जातो. त्यात कधी कोण जिंकेल, कोण बाद होईल, हे सांगता येत नाही. जीवनही असंच अनिश्चिततेने भरलेलं असतं. कधी सुखाचे क्षण येतात, तर कधी अडचणींचा सामना करावा लागतो. क्रिकेटमधील फलंदाजी आणि गोलंदाजी ही दोन्ही संघांसाठी संधी असतेजिंकण्याची, टिकून राहण्याची आणि विजय मिळवण्याची.बालपण, किशोरावस्था आणि तारुण्य यांना आपण फलंदाजी समजू शकतो. ही जीवनातील अशी अवस्था असते, जिथे आक्रमकता, ऊर्जा, स्वप्न आणि प्रयत्नांची गरज असते. याच काळात माणूस अधिक कमवतो, शिकतो, अनुभव घेतो आणि भविष्य घडवतो. प्रौढावस्था आणि वृद्धावस्थेला आपण गोलंदाजी आणि क्षेत्ररक्षणाशी जोडू शकतो. ही अवस्था असते संयमाने, चातुर्याने आणि अनुभवाच्या आधारे संकटांशी लढण्याची. क्रिकेटमध्ये प्रत्येक गोलंदाज आपला षटक जपून टाकतो. प्रत्येक चेंडू विचारपूर्वक फेकतो. तसंच जीवनातही प्रत्येक क्षण संकटांविना जाईल, यासाठी माणसाने सतर्क राहायला हवं. जशी फलंदाजी म्हणजे धावा काढणं, तशीच जीवनातही वेगवेगळ्या गोष्टी 'कमावणं' खूप महत्त्वाचं आहे. कमवणं म्हणजे केवळ पैसा नव्हे, तर अनुभव, ज्ञान, प्रतिष्ठा, नाती, आरोग्य आणि आत्मिक समाधानही कमावणं होय.गोलंदाजी आणि क्षेत्ररक्षण म्हणजे स्वतःचा बचाव करणं. आजार, अपयश, शत्रू, नैसर्गिक संकटं आणि अपघात यांपासून स्वतःला सुरक्षित ठेवणं म्हणजे क्षेत्ररक्षण. क्षेत्ररक्षक नेहमी सज्ज असतो, तसंच जीवनातही माणसाने संकटं केव्हा येतील, याची जाणीव ठेवावी लागते. हे गाणं एका फलंदाजाच्या दृष्टिकोनातून लिहिलं गेलं आहे. आपण जीवन जगत असताना फलंदाजी करत असतो, तर आपल्या विरोधात अनेक 'गोलंदाज' तयार असतात म्हणजेच आपल्याला त्रास देणारे, टिका करणारे किंवा अपयशी करण्यासाठी टपलेले लोक. 'यष्टीरक्षक' हे आपल्या मागे उभे असलेले जवळचे लोक देखील कधी कधी अपयशासाठी कारणीभूत ठरतात. त्यांच्या नजरा सतत आपल्यावर असतात, आपण चूक करतोय का यासाठी.'झेल' घेणारे क्षेत्ररक्षक जसे कुठे चूक होईल याची वाट पाहत असतात, तसेच जीवनात काही लोक आपल्या अपयशाची वाट पाहत असतात. म्हणून प्रत्येक निर्णय फार विचारपूर्वक घ्यावा लागतो. व्यवहारिक दृष्टिकोन, संयम, आणि चतुराई या गुणांमुळे माणूस या 'झेलां'पासून वाचू शकतो. जीवनात अनेक संधी येतात. त्या वेळच्या वेळेस ओळखणं आणि त्यांचं सोनं करणं हीच खरी कौशल्याची कसोटी असते. जसे क्रिकेटमध्ये एक चांगली चेंडू सोडून दिली तर ती पुन्हा मिळत नाही, तसंच जीवनातही एकदा संधी गेली की ती पुन्हा मिळेल याची खात्री देता येत नाही. जीवन म्हणजे क्रिकेट राजा! इथे प्रत्येकाला आपली 'इन्हिंग' खेळायची आहे. कुणी धावांची शतकं करतो, कुणी एकाच चेंडूवर बाद होतो. पण महत्त्वाचं हे आहे की, आपण खेळत राहिलं पाहिजे! शेवटी, ''हुकला तो संपला'' हे शब्द हे फक्त इशारा नाही, तर जीवनाचं गमक सांगणारे शब्द आहेत. म्हणूनच प्रत्येक दिवस, प्रत्येक क्षण, ही एक नवीन संधी आहे. त्याचं सोनं करा कारण जीवन म्हणजेक्रिकेटराजाहुकलातोसंपला!



**किशोर जाधव,**
सोलापूर
मो. ९९२२८८२५४१

# माणूस फक्त माणूस म्हणून का ओळखला जात नाही?

**पृथ्वीवर** वेगवेगळ्या प्राण्यांचे वास्तव्य आहे.जंगलात,शेतात,रान शिवारात आणि माणसांसोबत गावात आणि शहरात हे प्राणी राहतात.या प्राण्यांची जीवनशैली वेगवेगळी असते.या प्राण्यांचे एक खास वैशिष्ट्य असते.त्यावरून त्या प्राण्यांची ओळख होते. वाघ हा वाघ म्हणून,हत्ती हा हत्ती म्हणून,लांडगा हा लांडगा म्हणून,कोल्हा हा कोल्हा म्हणून आणि सिंह हा सिंह म्हणूनच ओळखले जातात.तसे माणूस हा माणूस म्हणून का ओळखला जात नाही?माणूस कधी लबाड लांडगा, कधी धूर्त कोल्हा,कधी रानटी डुक्कर तर कधी फुत्कार मारणारा विषारी नाग का असतो?एकट्या माणसाची अशै वेगवेगळी ओळख का होत असते? जंगलातले हिंस्त्र प्राणी हे इतर सजीवांची शिकार करून आपल्या भोजनाची व्यवस्था करतात.ते गवत थोडेच खाणार आहेत?इतर रानटी जनावरांचा सुळसुळाट व त्यांचा कावेबाजपणा जंगलात सतत सुरू असतो.ते कधीच शांततेने व सभ्यतेने जीवन जगत नसतात.आपल्यापेक्षा कमी ताकदीचे आणि भित्रे प्राणी शोधायचे,त्यांची शिकार करायची आणि पोटाची भूक मिटवायची, असा त्यांचा नित्यक्रम ठरलेला असतो.माणूस नावाचा प्राणी सध्या असेच विचित्र वागत आहे.माणूस वाघाच्या,सिंहाच्या,लांडग्याच्या आणि इतर हिंस्त्र प्राण्यांच्या रुपात आला की तो भित्र्या,कमकुवत, गरीब माणसांची शिकार करायला टपलेला असतो.माणूस लबाड लांडगा बनून दुसऱ्यांची संपत्ती हडप करतो.माणूस धूर्त कोल्हा बनून इतर माणसांची फसवणूक करतो.माणूस सैतान बनून अबला नारींच्या इज्जतीचे लचके तोडतो. माणूस दांडगट बनून नातेवाईकांची संपत्ती हडपण्याचे कपटी डाव खेळतो.माणूस गोगलगाय बनून कोणाच्या तरी पोटात शिरतो. वेळप्रसंगी विषारी नाग बनून असा डसतो की पाणी सुध्दा मागू देत नाही.कधी माणूस मगर बनतो आणि सगळ्या गरीब जलचर प्राण्यांना गिळतो. माणूस मगरीसारखा हिंस्त्र बनून आपल्याच माणसांना मटकन गिळतो.माणूस चतूर परंतु कपटी कावळा बनून दुसऱ्यांच्या ताटातली भाकरी चटकन उचलतो आणि लांब जाऊन शांतपणे खात बसतो.माणूस हा एकटा असा प्राणी आहे जो नेहमी इतर प्राणी बनून आपले वेगवेगळे वाईट दुर्गुण आणि मानसिक अवस्था दाखवतो.माणूस भ्रष्टाचार करतो,अफरातफर करतो,लाच घेतो.पैसाच पैसा कमावतो आणि वाईट मार्गाने कमावलेल्या पैशाचा गैरवापर करतो. आणि केलेल्या पापाचे प्रायश्चित्त म्हणून देवदर्शन करायला जातो,कुंभमेळ्यात जाऊन डुबकी मारून शुध्द होतो.हे कितपत योग्य आहे?खरेतर माणसाने एकानंतर एक वाईट कर्मांचा सपाटा सुरू केला आहे. एकीकडे आपण 'माणसाने माणसाशी माणसासम वागणे'ही प्रार्थना अगदी आवडीने व एकाग्रतेने गातो.परंतु,ही प्रार्थना आपल्या आचरणात कुठेही दिसत नाही.आपण सगळे फक्त नावाला माणसे आहोत पण वागायला, बोलायला आणि व्यवहाराला मात्र हिंस्त्र प्राणी आहोत.सध्या जिकडे तिकडे भ्रष्टाचार बोकाळला आहे. लोकांची नितीमत्ता ढासळलेली आहे.प्रामाणिकपणे कष्ट करण्याची प्रवृत्ती संपली आहे. दुसऱ्यांची संपत्ती हडप करून श्रीमंत होण्याचा सपाटा सुरू आहे. एकट्या दुकट्या महिलांकडे वाईट नजरेने पाहणाऱ्या नजरा वाढल्या आहेत.रोज वर्तमानपत्रांत माणसांच्या हातून घडणाऱ्या कुकर्मांच्या बातम्या छापून येत आहेत.क्षुल्लक कारणांमुळे खून करण्यापर्यंत मजल जात आहे. मुलगा आणि वडील,मुलगा आणि आई,भाऊ आणि भाऊ,भाऊ आणि बहीण या पवित्र नात्यांमध्ये कटुता निर्माण झाली आहे.नात्यांमधील आपुलकी नष्ट झाली आहे. ही सगळी लक्षणे माणसांमध्ये पशुता आले असल्याचे आहेत. म्हणून माणूस हा माणूस असला तरीही तो हिंस्त्र प्राणी बनून जीवन जगत आहे.या कारणास्तव माणूस हा इतर प्राण्यांच्या नावाने ओळखला जात आहे.ही बाब भविष्यात आणखी धोकादायक ठरू शकते.त्यासाठी माणसाने फक्त माणूस बनून जगावे. आणि माणसाची ओळख फक्त माणूस म्हणून व्हावी हीच सदिच्छा!



**बबन दामोदर गुळवे**
उमरगा कोर्ट ता.अहमदपूर
जि.लातूर
.मो.९७३०९३९७३२.

# ई–बस जनतेची,श्रेयवाद गद्दारांचा ?

## उमरगा-लोहारा परिसरातील ई-बस सेवा आणि थिल्लर राजकारणाचा भांडाफोड

ई–बस म्हणजे शून्य प्रदूषण, आधुनिक सार्वजनिक सेवा, आणि ग्रामीण भागातील विकासाचा नव्या दिशेने सुरू झालेला प्रवास. महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांमध्ये, विशेषतः धाराशिव विभागात, या क्रांतिकारी वाहनसेवेचा शिरकाव झाला असून उमरगा, तुळजापूर, कळंब आणि धाराशिव या ठिकाणी ही सेवा पोहोचत आहे. ही गोष्ट निश्चितच स्वागतार्ह आहे, पण या मागे श्रेय घेण्याचा जो केविलवाणा आणि हास्यास्पद प्रयत्न काही निवडणुकीत पराभूत झालेल्या स्थानिक तथाकथित नेत्यांकडून सुरू आहे, त्यावर आता स्पष्ट आणि ठाम बोलणे अत्यावश्यक ठरते.

ई–बस धोरणाची खरी पार्श्वभूमी:
महाराष्ट्रात ई–बस धोरण १३ जुलै २०२१ रोजी महाराष्ट्र राज्याच्या ''२०२१'' अंतर्गत लागू करण्यात आले. त्या वेळी पर्यावरण मंत्री होते आदित्य ठाकरे आणि परिवहन मंत्री होते अनिल परब.
त्यांनीच मुंबई, पुणे, नागपूर, औरंगाबादसारख्या महानगरांत ई–बस सुरु करताना ''२०३० पर्यंत सार्वजनिक वाहतुकीचे संपूर्ण विद्युतीकरण'' हे उद्दिष्ट जाहीर केले. या धोरणाअंतर्गत राज्यभरात एमएसआरटीसी ( महामंडळ) व महानगरपालिकांच्या माध्यमातून हजारो इलेक्ट्रिक बसेस कार्यान्वित करण्याचा निर्णय घेतला गेला. हे धोरण गद्दार शिंदे गट सत्तेवर येण्याच्या आधीचे आहे, आणि ते आदित्य ठाकरे यांच्या पर्यावरण खात्याची दूरदृष्टी होती, हे



विसरून चालणार नाही.
धाराशिव विभागाची अग्रगण्य भूमिका:
ई–बस धोरण लागू होताच, धाराशिव एस.टी. विभागाने २०२२ मध्येच राज्य सरकारकडे १२६ ई–बस मागणीचा प्रस्ताव पाठवला होता.
या प्रस्तावामध्ये:
* २८ ई–बस उमरगा आगारासाठी
* २४ ई–बस तुळजापूरसाठी
* २० ई–बस कळंबसाठी
* ५४ इतर आगारांसाठी
असे स्पष्ट वर्गीकरण करण्यात आले होते.
हा प्रस्ताव स्थानिक अधिकाऱ्यांनी, जिल्हा स्तरावरील अधिकारी, परिवहन नियंत्रक, व धाराशिव विभागाने सामूहिकपणे पाठवला होता. त्या वेळी ना शिंदे गट सत्तेवर होता, ना सध्या पराभूत होवूनही लुडबूड करणाऱ्यांचे या प्रक्रियेवर कोणते राजकीय किंवा प्रशासकीय नियंत्रण होतं. तरीही आता श्रेय लाटण्याचे हास्यास्पद प्रयत्न सुरू आहेत, जे अत्यंत लज्जास्पद आहेत.
ई–बस मी आणली'' – ही 'अहं'पणाची विकृती!
लोकप्रतिनिधींचं काम म्हणजे योजना राबवणं, पाठपुरावा करणं आणि अंमलबजावणीस मदत करणं. पण याचा अर्थ असा नाही की त्या सार्वजनिक योजनांचे एकमेव हक्कदार आपणच असल्याचा गजर करावा!ही सेवा जनतेसाठी आहे:
* जनतेच्या करातून निधी मिळतो
* महामंडळ ही सार्वजनिक संस्था आहे
* शासन निर्णय हे राज्यव्यापी धोरणांतर्गत घेतले जातात
मग एखाद्या लोकप्रतिनिधीने, त्यातही पराभूत झालेल्या उमेदवाराने, स्वतःची वैयक्तिक यशोगाथा म्हणून त्याची जाहिरातबाजी करणे हे अत्यंत गचाळ, थिल्लर, आणि लोकशाहीविरोधी वर्तन आहे. यातून संबंधिताची अहंकार विकृती दिसून येते.स्वतःची जमीन विकून सेवा दिली का? मग एवढा गवगवा कशाला?जर एखाद्या नेत्याने:
* स्वतःचे खासगी पैसे खर्च करून चार्जिंग स्टेशन उभे केले असते,
* स्वतःच्या मालकीची बस चालवली असती,
* स्वतःच्या मानधनाचा त्याग करून जनतेला मदत केली असती,
तर ठिक आहे, त्याचं श्रेय घ्या.
पण जनतेच्या करातून, शासनाच्या धोरणातून आणि प्रशासनाच्या कामातून आलेली सेवा ही ''मी दिली'' असे सांगणे म्हणजे लोकशाहीची चेष्टा आहे. श्रेयवाद नव्हे, उत्तरदायित्व हवे!आज गरज आहे ती जनतेच्या पैशाचं योग्य नियोजन करण्याची, सेवा सुरळीत चालवण्याची आणि सार्वजनिक परिवहन व्यवस्थेची शाश्वतता राखण्याची.शाब्दिक जाहिरातबाजी नव्हे तर प्रत्यक्ष कृतीला प्राधान्य द्यायला हवे.यासाठी जनतेने विचारले पाहिजे:
* बस चालवण्यासाठी चार्जिंग स्टेशन पुरेसे आहेत का?
* चालक, वाहक यांना प्रशिक्षण देण्यात आले आहे का?
* बस वेळेवर धावतात का?
* ग्रामीण मार्गांवर ई–बस सक्षम आहेत का?
* पुरेसा व सुरळीत विद्युत पुरवठा उपलब्ध होईल का?
* एकूण २८ ई – बसेसची मागणी झाली, ज्या जानेवारी २०२५ पर्यंत येणे अपेक्षित होते. मग त्यापैकी फक्त १० बसेसच का आल्या? उर्वरित १८ कधी येणार? २८ हा आकडा तरी पुरेसा आहे का?
ही खरी उत्तरदायित्वाची मोजणी आहे, फेसबुक स्टोरीत ''मीच आणली ई–बस'' असे पसारा मांडणे नव्हे.उपेक्षित प्रश्न: ई–बस ग्रामीण भागात किती सक्षम?उमरगा सारख्या अर्ध–ग्रामीण भागात:
* वीजपुरवठा सातत्याने आहे का?
* रस्ते बससाठी योग्य आहेत का?
* स्थानिक चार्जिंग सुविधा कार्यरत आहेत का?
* बसचा मार्ग ग्रामीण भागातून आहे की केवळ काही मोजक्या शहरी भागांना जोडणारा आहे.
* बसचे तिकीट माफक व सर्वसामान्याच्या खिशाला परवडणारे आहे का? की त्याबाबत वेगळ्या धोरणांची आवश्यकता आहे?हे तपासले गेले पाहिजे. कारण योजना फक्त कागदावर नाही, प्रत्यक्ष जमिनीवर उतरावी लागते. यासाठी राजकारण नव्हे तर व्यवस्थापन, नियोजन आणि लोकसहभाग आवश्यक आहे.जनताच मालक आहे.लोकप्रतिनिधी हे जनतेचे सेवक आहेत, मालक नव्हेत.ई–बस हा लोकांचा हक्क आहे, कोणाच्याही दयेने मिळालेला लाभ नव्हे.ही सेवा गर्वाचा विषय आहे, परंतु व्यक्तिकेंद्रित श्रेयवादाचा नव्हे.मीच आणली'' म्हणणाऱ्या प्रत्येक नेत्याने एकदा तरी गाडी धुऊन, त्यात तिकीट काढून, प्रवासी सेवा करून दाखवावी, म्हणजे लोकप्रतिनिधी म्हणजे काय हे त्यांनाही उमगेल.



**ॲड. शीतल शामराव चव्हाण**
(मो.९९२१६५७३४६)

# जनतेमध्ये जा, त्यांचे प्रश्न सोडवा

## राजन साळवी यांचे शिवसैनिकांना आवाहन

**आरंभ मराठी | धाराशिव**

शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारानुसार ८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण हा भाग मानून शिवसैनिकांनी तसेच पदाधिकाऱ्यांनी जनतेमध्ये जावे, त्यांचे प्रश्न समजून घेऊन कामे करावीत, केवळ निवडणुकापुरते मर्यादित न राहता सातत्याने १२ महिने समाजसेवेची कामे करा, असे आवाहन शिवसेनेचे समन्यवक राजन साळवी यांनी केले.धाराशिव–कळंब विधानसभा मतदारसंघातील आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर शिवसेना समन्वयक तथा माजी आमदार राजन साळवी यांच्या प्रमुख उपस्थितीत एक महत्त्वपूर्ण आढावा बैठक आयोजित करण्यात आली. शासकीय विश्रामगृहात पार पडलेल्या या बैठकीला धाराशिव–कळंब विधानसभा क्षेत्रातील सर्व प्रमुख पदाधिकारी, महिला आघाडीच्या कार्यकर्त्या, युवासेना तसेच शिवसेनेच्या अंगीकृत विविध संघटनांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या बैठकीत आगामी निवडणुकांमध्ये शिवसेनेच्या संघटनात्मक बळकटीकरणाबाबत सखोल चर्चा करण्यात आली. या बैठकीसाठी




माजी आमदार ज्ञानराज चौगुले, शिवसेना जिल्हाप्रमुख सुरज साळुंके, मोहन पनुरे, तसेच तालुका आणि जिल्हा स्तरावरील प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. आगामी निवडणुका लक्षात घेता पक्षशिस्त, संघटन बांधणी, कार्यकर्त्यांशी संवाद आणि जनतेच्या अडचणींवर तातडीने कृती यावर भर देण्याचे निर्देश साळवी यांनी दिले. स्थानिक प्रश्नांची माहिती घेऊन ते मार्गी लावण्यासाठी तातडीने योजना आखण्याचेही निर्देश त्यांनी बैठकीत दिले. तसेच, पक्षाच्या सध्या सुरु असलेल्या सदस्य नोंदणी अभियानात अधिक गती आणण्यासाठी सर्वांनी गावपातळीवर सक्रिय राहावे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक,संपादक चंद्रसेन गोविंदराव देशमुख यांनी आदेश प्रिंटर्स, रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव, ता. जि. धाराशिव येथे छापुन रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. (न्यायीक क्षेत्र धाराशिव) संपादक श्री. चंद्रसेन गोविंदराव देशमुख. मो.नं. ९८२२५९३९८०,विभागीय कार्यालयः सेक्टर नंबर ३२४, ई वॉर्ड, रिवोल्युशन, ऑफिस नंबर युजी ०७,स्टेशन रोड, करवीर, कोल्हापूर RNI NO.- 2023/90078,

# रस्त्याच्या दुरावस्थेमुळे नळदुर्गकर त्रस्त ; लाखो रुपये खर्च करूनही रस्ते खड्ड्यात

## मुख्य रस्त्यावर अपघातांचे प्रमाण वाढले;पालिकेकडून केवळ कोरडी आश्वासने

आरंभ मराठी | नळदुर्ग



मागील काही दिवसापासून पडत असलेल्या संततधार पावसामुळे नळदुर्ग शहरातील रस्त्यावर पडलेल्या खड्ड्यात सर्वत्र पाणी व चिखल साचल्यामुळे रस्त्यात खड्डे की खड्ड्यात रस्ता असा प्रश्न शहरवासीयांच्या वतीने उपस्थित केला जात आहे. कारण नळदुर्ग शहरातील रस्त्यांची अक्षरशः वाट लागली आहे. नळदुर्ग शहरातील काही भागात सध्या सुवर्ण जयंती नगरोत्थान योजनेतून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने ९३.४२ लाख रुपये खर्च करून रस्ते व गटारीची कामे केली जात आहेत. मात्र या कामांचे अंदाजपत्रक तयार करताना ज्या ठिकाणी कामे करण्यात येणार आहेत, त्या ठिकाणी लोकवस्ती आहे किंवा नाही याचा विचार न करता दप्तरी बसून कोणाला तरी पोसण्यासाठी अंदाजपत्रक तयार करून मिळालेल्या निधीची विल्हेवाट कशी लावायची हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून कामे केली जात असल्याचे दिसून येत आहे. वास्तविक पाहता नळदुर्ग शहरातील अनेक भागात रस्त्यावर ठिकठिकाणी मोठ मोठे खड्डे पडल्यामुळे रस्त्यांची दयनीय अवस्था झाली आहे. असे असताना त्याकडे प्रशासन तसेच लोकप्रतिनिधींचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येत आहे. कारण नळदुर्ग शहरातील बस स्थानकासम ोरून बाजारपेठ ते किल्ल्याकडे जाणाऱ्या रस्त्यावर अनेक ठिकाणी खड्डे पडले आहेत. त्याचबरोबर हुसेनी चौक ते नानीमा रोड, हनुमान मंदिर पर्यंत जाणाऱ्या रस्त्यावर, तसेच चावडी चौक पासून धर्मवीर संभाजी चौक पर्यंत जाणाऱ्या रस्त्यावर, त्याचबरोबर माऊली नगर ते नगरपालिकेकडे जाणाऱ्या रस्त्यावर, तसेच राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६५ लगत असलेल्या हमीद खॉ चौक ते कुरेशी गल्ली पासून पुढे पोस्ट ऑफिस कडे जाणाऱ्या रस्ता पूर्णपणे खराब झाला आहे. रहीम नगर भागातील काही अंतर्गत रस्ते खराब झाल्यामुळे दयनीय अवस्था झाली आहे. त्याचबरोबर शहरातील अनेक भागातील रस्त्यांची मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली आहे. सध्या पावसाळ्याचे दिवस असल्यामुळे शहरातील जवळपास सर्वच रस्त्यांवर पडलेल्या खड्ड्यामुळे डबके साचून चिखलमय झाले आहेत. रस्त्यावर पडलेल्या खड्ड्याचा अंदाज येत नसल्यामुळे खड्डे वाचविण्याच्या नादात दुचाकीस्वार एकमेकांना धडकून तसेच घसरून पडत आहेत. त्याच्यापेक्षा बिकट अवस्था आठवडी बाजार भरत असलेल्या रस्त्याची झाली आहे. त्यामुळे या ठिकाणी बाजारात येणाऱ्या व्यापाऱ्यांना चिखलात बसून व्यापार करावा लागतो. त्यामुळे व्यापाऱ्यांना व भाजीपाला खरेदीसाठी बाजारात येणाऱ्या ग्राहकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे.

### रस्त्यांची कामे तात्काळ करून दिलासा द्यावा

सध्या पावसाळ्याचे दिवस असल्यामुळे रस्त्यावर पडलेल्या खड्ड्यामुळे मोठ्या प्रम ाणात पाणी खड्ड्यात साचून चिखल होत आहे. त्यामुळे नाहक त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे नगरपरिषद प्रशासनाने तात्काळ शहरातील रस्त्यांची कामे करून शहरवासीयांना होणारा त्रास कमी करावा.

**फुरखान शेख**
नागरिक, नळदुर्ग.

### निधीचा उपयोग शहरासाठी की गुत्तेदारांसाठी

आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी नळदुर्ग शहराच्या सर्वांगीण विकासासाठी शासनाकडून मोठ्या प्रमाणात निधी खेचून आणला. मात्र, या निधीचा जास्तीत जास्त खर्च शहरातील रस्ते व गटारीसाठी होणे अपेक्षित असताना ज्या ठिकाणी लोकवस्ती नाही अशा ठिकाणी रस्ते व गटारीची कामे केली जात आहेत. त्यामुळे त्या निधीचा उपयोग सर्वसामान्य माणसाच्या हितासाठी की गुत्तेदार व कार्यकर्त्यांना पोसण्यासाठी असा प्रश्न शहरवासीयांच्या वतीने उपस्थित केला जात आहे.

### शहरातील कामे लवकरच सुरू होतील

डीपीडीसी मधून नळदुर्ग शहरातील रस्त्यांच्या कामांसाठी साडेतीन कोटींचा प्रस्ताव दाखल करण्यात आला आहे. त्याला लवकरच मंजुरी मिळाल्यानंतर शहरातील रस्त्यांची कामे सुरू करण्यात येणार आहेत.

**लक्ष्मण कुंभार**
मुख्याधिकारी, नगर परिषद नळदुर्ग.

# अचलबेट देवस्थान येथे २२ दिवशीय श्रीहरी भजनसेवा पर्वाचे आयोजन

आरंभ मराठी | उमरगा



उमरगा तालुक्यातील तुरोरी जवळील श्री क्षेत्र अचलबेट देवस्थान येथे श्रावण मासानिमीत्त २२ दिवशीय श्रीहरी भजनसेवा पर्वाचे आयोजन गोकुळाष्टमी १६ ऑगस्टपर्यंत करण्यात आले आहे. श्री क्षेत्र अचलबेट देवस्थान येथे श्रावण महिन्यात दरवर्षी प्रमाणे यंदाही हजारो भाविक भक्तांच्या उपस्थितीत २२ दिवशीय भजनसेवा पर्वाचे आयोजन केले आहे. हभप. श्री. गुरूवर्य उज्वलानंद महाराजांच्या कृपाशीर्वादाने श्रावणातील दर सोमवारी सायंकाळी ७ ते ९ या वेळेत किर्तन होणार आहे. श्री क्षेत्र अचलबेट देवस्थान पंचक्रोशीतील तमाम भाविक भक्तांनी या सोहळ्याचा आनंद घ्यावा असे आवाहन श्री गुरु सेवाधारी भक्त परिवार, परमार्थ प्रबोधन सांस्कृतिक सेवा मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

# उमरगा शहरातील आर्य समाज भवनात “श्रावणी पर्व”सोहळा सुरु

## पहिल्या दिवशी चार यजमानांना संधी ; यज्ञ आहुती, प्रवचन व भजन कार्यक्रम रंगला

आरंभ मराठी | उमरगा

उमरगा शहरातील आनंदीपुर आर्य समाज भवनात श्रावणी पर्व सोहळ्याचे आयोजन रविवार दिनांक २७ जुलै ते ३१ जुलै पर्यंत आयोजित करण्यात आले असून, या सोहळ्यात चार यजम ानांना यज्ञ सोहळ्यात सहभागी करण्यात आले होते. वेद हे जगातील प्राचीन ग्रंथ आहेत. जगातील सर्व ज्ञानाचा मुळ उगम हा वेदात आहे. सर्वात महत्वाचे म्हणजे वेदातील सर्व ज्ञान विज्ञानाधिष्ठीत आहे. आजच्या आधुनिक युगात विज्ञानातील सर्व कसोट्यांवर ते सत्यात उतरते. त्यामुळे सद्य परिस्थितीत मानवाच्या सर्व समस्यांचे समाधान व जगताच्या कल्याणाचे सुत्र हे वेदात मिळते. त्यामुळे उपस्थित सर्वांनी ‘‘यज्ञो वै श्रेष्ठतम कर्म’’ हे ब्रीद वाक्य घेऊन यज्ञ सोहळ्यात सहभागी झाले आहेत. त्यामुळे रविवार दि. २७ रोजी पासून पाच दिवसांच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या वेळी यज्ञ, प्रवचन व भजन कार्यक्रम राजस्थान राज्यातील हनुमानगढ येथील आचार्य पं. नारायणसिंह आर्य व बरेली उत्तरप्रदेश येथील भजनोपदेशक पं. जितेंद्रदेव आर्य व सुरेंद्र आर्य यांनी मंत्रोच्चारण कार्य पार पाडले. यज्ञ सुरू होताच गायत्री मंत्र पठण करण्यात आले. या श्रावणी पर्व सोहळ्यात सर्वांनी सहभागी व्हावे असे आवाहन विठ्ठल जाधव गुरूजी, प्रदीप चालुक्य, माधवराव माने, कर्णसिंह गौतम, प्रा. शैलेश महामुनी, सुरेंद्र वाले, बाळासाहेब माने यांनी केले आहे.

# महाराष्ट्र राज्य शिक्षक सेनेच्या धाराशिव जिल्हा पदाधिकाऱ्यांची निवड जाहीर

आरंभ मराठी | धाराशिव



महाराष्ट्र राज्य शिक्षक सेनेच्या (उद्धव बाळासाहेब ठाकरे) धाराशिव जिल्हा कार्यकारिणीची निवड जाहीर करण्यात आली आहे. तालुक्यातील धारूर येथील भैरवनाथ हायस्कूलमध्ये महाराष्ट्र राज्य शिक्षक सेनेचे अध्यक्ष आमदार ज. मो. अभ्यंकर यांच्या प्रमुख उपस्थितीत धाराशिव जिल्हा शिक्षक सेनेची आढावा बैठक पार पडली. या बैठकीत शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या आदेशानुसार व धाराशिवचे खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर, शिवसेना जिल्हाप्रमुख आमदार कैलास पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली या निवडी जाहीर करण्यात आल्या. जिल्हा कार्यकारिणीत शिक्षक सेना महिला आघाडी जिल्हाध्यक्षपदी तनुजा दुलंगे, जिल्हा उपाध्यक्ष मोतीराम राठोड, धाराशिव तालुकाध्यक्ष किरण शानमे, तालुका सचिव सचिनकुमार सोनकटाळे, तालुका सहसचिव नितीन चौधरी, तुळजापूर तालुकाध्यक्षपदी सत्यवान गायकवाड, लोहारा तालुकाध्यक्ष राजेंद्र गावडे, तालुका उपाध्यक्ष संतोष कांबळे तर वाशी तालुकाध्यक्षपदी शशिकांत सरवदे यांची निवड घोषित करण्यात आली. निवडीनंतर सर्व पदाधिकाऱ्यांचा नियुक्तीपत्र देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी राज्य सरचिटणीस रमेश चौगुले, राज्य उपाध्यक्ष विठ्ठल चव्हाण, दत्ता पवार, उर्दू विभाग अध्यक्ष मुश्ताक पटेल, मराठवाडा विभाग अध्यक्ष नामदेव सोनवणे, मराठवाडा विभाग कार्याध्यक्ष बाळासाहेब राखे, धाराशिव जिल्हा शिवसेना समन्वयक तथा शिक्षक सेनेचे धाराशिव जिल्हा संपर्कप्रमुख दिनेश दत्ता बंडगर, धाराशिव जिल्हाध्यक्ष विजयकुमार कुलकर्णी, बाळासाहेब मुळे, जिल्हा उपाध्यक्ष विभुते, शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षक सेना पदाधिकारी उपस्थित होते.

# रोटरी क्लब मुरुम सिटीचा पदग्रहण व चार्टर प्रदान सोहळा उत्साहात

## रोटरीचे कार्य समाजाला दिशा देणारे-आ. प्रवीण स्वामी

आरंभ मराठी | मुरुम




रोटरी ही संस्था केवळ एक सेवाभावी संघटना नसून, ती समाजातील गरीब, दुर्लक्षित व पीडित घटकांसाठी प्रेरणादायी कार्य करणारी जागतिक संस्था आहे, असे प्रतिपादन उमरगा-लोहारा मतदारसंघाचे आमदार प्रविण स्वामी यांनी केले. मुरुम येथील रत्नमाला मंगल कार्यालयात रविवारी (ता. २७ जुलै) रोजी रोटरी क्लब मुरुम सिटीच्या नूतन अध्यक्ष व सचिवांच्या पदग्रहण व चार्टर प्रदान सोहळ्यात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष बापूराव पाटील होते. यावेळी रोटरी प्रांत ३१३२ चे सहाय्यक प्रांतपाल प्रदीप मुंडे, सहाय्यक प्रांतपाल श्रीराम देशपांडे, माजी अध्यक्ष कमलाकर मोटे, सचिव सुनील राठोड यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व रोपारोपणाने करण्यात आली. अलका नंदकिशोर लोहिया व कोथळीकर यांच्या सौजन्याने पाच गरीब महिलांना शिलाई मशीन, पंडीत मुदकन्ना यांच्या मार्फत दहा विद्यार्थ्यांना स्कूल बॅग, सुनील राठोड यांच्या वतीने पाच स्कॉलरशिप प्राप्त विद्यार्थ्यांना पुस्तक संचाचे वाटप तर रोटरी क्लबच्या वतीने वही, पेन वाटप करण्यात आले. तसेच ॲड. उदय वैद्य यांना नोटरी लायसन्स मिळाल्याबद्दल, व कुमारी श्रावणी सूर्यवंशी हिचा वाढदिवस खास सत्काराने साजरा करण्यात आला. नूतन अध्यक्ष प्रा. डॉ. आप्पासाहेब सूर्यवंशी व सचिव कल्लप्पा पाटील यांनी पदभार स्वीकारताना आगामी वर्षातील सेवा उपक्रमांचा आराखडा सादर केला. नवीन कार्यकारिणीच्या सदस्यांचा रोटरी पिन लावून सत्कार करण्यात आला. सहाय्यक प्रांतपाल प्रदीप मुंडे यांनी रोटरीची सामाजिक बांधिलकी अधोरेखित करताना नूतन कार्यकारिणीस शुभेच्छा दिल्या. श्रीराम देशपांडे यांनी रोटरीच्या कार्यात मिळणाऱ्या आत्मिक समाधानावर भर देत, रोटरीत निर्माण होणाऱ्या दीर्घकालीन मैत्रीपूर्ण संबंधांवर भाष्य केले. पुढे बोलताना आमदार प्रवीण स्वामी यांनी आपल्या भाषणात रोटरी क्लबच्या कार्याचे कौतुक करत शिक्षण क्षेत्रातील वाढता ताण, स्पर्धा व त्यामुळे होणाऱ्या विद्यार्थी आत्महत्या या गंभीर बाबींवर भाष्य करत पालकांचे प्रबोधन आवश्यक असल्याचे मत बनले. रोटरी सारख्या संस्थेने अशा विषयांवर काम हाती घ्यावे, असे आवाहन केले.या सोहळ्यात गोविंद पाटील, डॉ. विजयानंद बिराजदार, डॉ. नितीन डागा, डॉ. महेश स्वामी, उल्हास घुरघुरे, धनराज मंगरुळे, प्रकाश रोडगे, आप्पासाहेब पाटील, उदय वैद्य, भूषण पाताळे, मल्लिकार्जुन बदोले, शरणाप्पा धुम्मा, राजेंद्र वाकडे, शिवकुम ार स्वामी, बबनराव बनसोडे, अमित पोतदार आदी मान्यवरांनी उपस्थित राहून कार्यक्रमाला भव्यतेची किनार दिली. प्रास्ताविक प्रा. डॉ. महेश मोटे यांनी केले. सूत्रसंचालन संतोष कांबळे यांनी तर आभार प्रदर्शन नूतन सचिव कल्लप्पा पाटील यांनी केले. कार्यक्रमास मुरुम शहर व परिसरातील विविध क्षेत्रातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गुंतवणूकदारांना कोट्यवधींचा चुना लावणाऱ्या पार्वती मल्टीस्टेट बँकेच्या फसवणुकीविरुद्ध न्यायालयीन लढाईची तयारी

## अनिल जगताप यांच्या नेतृत्वाखाली रस्त्यावरही आंदोलन सुरु

आरंभ मराठी | लोहारा



पार्वती मल्टिस्टेट बँकेच्या फसवणूकी विरोधात सामाजिक कार्यकर्ते अनिल जगताप यांच्या नेतृत्वाखाली रस्त्यावरील लढाईसोबतच न्यायालयीन लढाईची देखील तयारी करण्यात आली आहे. रविवारी (दि.२७) आष्टामोड येथील साई मंदिरात पुन्हा एकदा सर्व खातेदारांची बैठक झाली. यापुढील सर्व प्रक्रिया व जो निर्णय अनिल जगताप घेतील तो आम्हाला मान्य असेल असा विश्वास दाखवत न्यायालयीन व रस्त्यावरच्या आंदोलनासाठी तयार असल्याचे सर्वांनी सांगितले. पार्वती मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीमध्ये खातेदारांच्या खूप मोठ्या रकमा अडकल्या असून, बँकेने शाखा बंद केल्याने खातेदार हवालदिल झाले आहेत. उमरगा व लोहारा तालुक्यातील सर्व खातेदारांनी अनिल जगताप यांना साकडे घालून या प्रकरणात लक्ष घालण्याची विनंती केली होती. त्यानुसार त्यांच्या उपस्थितीत दोन बैठका पार पाडून पुढील करावयाच्या सर्व नियोजनाची तयारी पूर्ण झालेली आहे. २०१५ मध्ये पार्वती मल्टीस्टेट बँकेची स्थापना करण्यात आली होती. मुख्य कार्यालय दत्तनगर पुणे येथे असून त्याच्या लोहारा, सास्तुर, सालेगाव, तुरोरी, कजगी, डाळिंब या ठिकाणी शाखा उघडण्यात आल्या. ज्यादा रकमेचे आमिष दाखवल्यामुळे अनेकांनी या शाखामधून मोठ्या रकमा जमा केल्या. अगदी १२% पर्यंत व्याजदर देण्याचे अमिष खातेदारांना दाखवण्यात आल्याचे त्यांच्या एफडीवरून दिसत आहे. २०२३ पर्यंत बँक सुरळीत चालू होती. मात्र, त्यानंतर हळूहळू खातेदारांची रक्कम देण्यास बँकेकडून टाळाटाळ होण्यास सुरुवात झाली. त्यानंतरच्या कालखंडात तर शाखा बंद झाल्या त्यामुळे आता एकही रुपया खातेदारांना मिळत नाही. त्यामुळे आता ही सर्व प्रक्रिया न्यायालयीन व रस्त्यावरच्या आंदोलनात सुरू करून पैसे मिळवण्यासाठी खातेदार प्रयत्नाची पराकाष्ठा करत आहेत.

### मानसिकतेवर परिणाम होत आहे

अनेक ठेविदारानी आयुष्यभर घाम गाळून कष्ट करून लाखो रुपयांच्या ठेवी पार्वती मल्टीस्टेट मध्ये ठेवल्या. मात्र, आता त्यांचा पैसा मिळत नाही. त्यामुळे आर्थिक कुचंबणा आणि त्यांच्या मानसिकतेवर परिणाम होत आहे.

**दिलीप दत्तू गोरे**
रा. सालेगाव.

### गुंतवणूकदारांची रक्कम परत मिळवून देणारच

बँकेत अनेक शेतकरी, कष्टकरी, दिव्यांग अपंग महिला यांनी ठेवी ठेवल्या आहेत. रकमेचा आकडा खूप मोठा असून, आर्थिक गुन्हे अन्वेषण विभागाने दाखल केलेल्या ४०० मधील केवळ १६२ खातेदारांचा ५ कोटी ७३ लाखाचाच उल्लेख आहे. मात्र, ही रक्कम खूप मोठी आहे. सर्व ठेवीदारांनी यात लक्ष घालण्याची मला विनंती केली आहे. यात मनी लोंडरिंग झाल्याची शक्यता नाकारता येत नाही. उच्च न्यायालय, इडी, आरबीआय, सहकार, जिल्हाधिकारी यांच्याकडे वेगवेगळ्या याचिका दाखल करून त्यांचा एक ना एक रुपया मिळवून दिल्याशिवाय स्वस्त बसणार नाही.

**अनिल जगताप**
सामाजिक कार्यकर्ते.

### आर्थिक गुन्हे अन्वेषण विभागातर्फे गुन्हे दाखल दोषारोप पत्रही दाखल मात्र आरोपी मोकाट

यासंदर्भात पोलीस स्टेशनमध्ये तक्रारी दाखल झाल्यानंतर रक्कम पंधरा लाखाच्या पुढे असल्याने आर्थिक गुन्हे शाखा धाराशिव यांनी तपास करून चेअरमन व काही संचालकांना अटक केली होती. मात्र काही महिने जेलमध्ये राहिल्यानंतर त्यांना जामीन मिळाला आहे. मात्र गुन्हा दाखल होऊन एक वर्ष झाले तरी अद्यापही काही संचालक अगदी उजळमाथ्याने मोकाट फिरत आहेत. त्यांच्या जामीन अर्जावर उमरगा सत्र न्यायालयात २४ ऑगस्ट रोजी सुनावणी होणार आहे.

### ४५ लाख रुपये दोन वर्षांपासून अडकले

मी माझ्या आयुष्यात एक एक रुपया जमा करून तसेच शेती विकल्यानंतर आलेली सर्व रक्कम पार्वती मल्टीस्टेट बँकेत फिक्स डिपॉझिट मध्ये ठेवली होती. ती ४५ लाख रुपये इतकी आहे. एफडी ची कालमर्यादा संपूर्णही दोन वर्षापेक्षा जास्त कालावधी झाला आहे. मात्र बँकेकडून एक रुपयाही मिळत नाही. विशेष म्हणजे बँकेचे पूर्वीचे व आत्ताचे चेअरमन माझ्याच गावातील आहेत तरी देखील माझ्यावरती आर्थिक अन्याय होत आहे.

### वमा संरक्षण नसल्याने खातेदारांना आर्थिक संकटाला तोंड द्यावे लागत आहे

पाच लाख रुपये च्या ठेवी असणाऱ्या काही मल्टीस्टेट व कॉपरेटिव्ह सोसायटी यांना विमा संरक्षण आहे. मात्र, पार्वती मल्टीस्टेट बँकेचा त्या यादीत समावेश नसल्याने आता सर्व खातेदारांना रक्कम मिळण्यासाठी न्यायालयाचाच शेवटचा आधार उरला आहे.

# संतधाममध्ये सोलापूरकरांच्या वतीने हरीनाम व त्रिकाळ हरिपाठ सप्ताहास प्रारंभ

आरंभ मराठी | तेर



मध्यवर्ती वारकरी सांप्रदायिक संस्था व नव मध्यवर्ती वारकरी सांप्रदायिक संस्था सोलापूर यांच्या वतीने श्री संत धाम गोरोबाकाका सेवा मंडळ परिसर ( ह.भ.प.संदिपान महाराज हासेगावकर यांचा फड) तेर येथे अखंड हरिनाम व त्रिकाळ हरिपाठ सप्ताह शुक्रवार पासून प्रारंभ झाला. या काळात अनेक कीर्तनकाराचे सकाळ व संध्याकाळ अशा दोन सत्रात कीर्तन सेवा आयोजित करण्यात आली आहे. यामध्ये १ ऑगस्ट रोजी संभाजी महाराज मेहुणकर यांचे काल्याचे कीर्तन होणार आहे. रोज दिवसभरात तीन वेळेस हरीपाठ, काकडा आरती, दोन वेळेस किर्तन, हरीजागर असा धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. हा सप्ताह सोहळा दिनांक २५ जुलै पासून शुक्रवार दिनांक १ ऑगस्टपर्यंत चालणार आहे. यामध्ये नामवंत कीर्तनकारांची सेवा होणार असून, या काळात दत्तात्रय महाराज सोनवणे दिंडोरी, माधव महाराज बोधले गौरकर, किरण महाराज शिंदे आष्टा ,सतीश महाराज कदम आष्टा, शिवाजी महाराज घाडगे गोवर्धन वाडी व सोमनाथ महाराज बाबर भूम यांची कीर्तन सेवा होणार आहे. १ ऑगस्ट रोजी हरिभक्त परायण संभाजी महाराज मेहूणकर दिंडोरी तालुका भूम यांची काल्याची कीर्तन सेवा होणार आहे. त्यानंतर सोमनाथ कबड्डी यांच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमास परिसरातील भाविकांनी उपस्थित राहून श्रवणाचा लाभ घ्यावा असे आवाहन मध्यवर्ती व नव मध्यवर्ती वारकरी संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.

# नागपंचमी सणानिमित्त महिलांना तुळजाभवानी मातेच्या गर्भ गाभाऱ्यात सोडण्याची मागणी

आरंभ मराठी | तुळजापूर

आज साजऱ्या होत असलेल्या नागपंचमी सणानिमित्त तुळजापूर शहरातील रहिवासी असलेल्या महिलांना तुळजाभवानी मातेच्या गर्भ गाभाऱ्यात दर्शनासाठी सोडण्याची मागणी निवेदनाद्वारे जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष मंदिर संस्थान यांच्याकडे करण्यात आली आहे. तुळजापूर येथील पुजारी बाळासाहेब भोसले यांनी निवेदन देत म्हटले आहे की, नागपंचमीचा सण तुळजापूर शहरामध्ये महिला मोठ्या प्रमाणावर साजरा करतात. तसेच आज तुळजाभवानी मंदिरामध्ये दर्शनासाठी येण्याची जुनी परंपरा देखील आहे. पूर्वी या दिवशी तुळजाभवानी मातेच्या गर्भ गाभाऱ्यातून दर्शन घेण्याची परंपरा होती. मात्र, गेल्या काही वर्षात ही परंपरा खंडित झाली असून, ती पूर्ववत चालू करून शहरातील सर्व महिला भगिनींना गर्भ गाभाऱ्यात दर्शनासाठी प्रवेश देण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच शहरातील महिलांना सिक्युरिटी गार्ड व मंदिर कर्मचाऱ्याकडून देण्यात येत असलेली अपम ानास्पद वागणुक थांबवण्यात येऊन महिलांना सन्मानपूर्वक दर्शनाची व्यवस्था करण्याची मागणी देखील या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. या निवेदनावर बाळासाहेब भोसले, इंद्रजीत साळुंके, संजय पेंदे, कुमार टोले यांच्या स्वाक्षरी आहेत.

दैनिक आरंभ मराठी

www.arambhmarathi.com

आपलं धाराशिव

मंगळवार,दि. 29 जुलै 2025

# स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीची तुळजापूरमध्ये सर्वपक्षीय इच्छुकांकडून तयारी

## श्रावणात मतदारांना देवदर्शनातून आकर्षित करण्याचे प्रयत्न

सुरज बागल | आरंभ मराठी

तुळजापूर – आगामी दोन-तीन महिन्यात होऊ घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीसाठी इच्छुक उमेदवारांनी तयारी सुरु केली आहे. वर्षातील पवित्र असलेल्या श्रावण महिन्यात आपल्या भागातील मतदारांना आकर्षित करण्यासाठी विविध ठिकाणची देवस्थानांची वारी घडवून आणण्यासाठी इच्छुक उमेदवार तयारी करत असून, त्यामुळे इच्छुक उमेदवारांनी आता निवडणुकीची तयारी सुरू केली असल्याचे दिसून येत आहे.




जवळपास चार वर्षापासून प्रलंबित असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका लवकरच होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. यामुळे आता इच्छुक उमेदवारांनी सर्व ठिकाणी तयारी सुरू केल्याचे दिसून येत आहे. मतदारांच्या गाठीभेटी घेऊन त्यांच्या अडीअडचणी सोडवण्याचे प्रयत्न सर्वच ईच्छुक उमेदवारांकडून करण्यात येत आहे. त्यातच आता वर्षातील सर्वात पवित्र महिना असलेला श्रावण महिना सुरु झालेला आहे. या महिन्यात अनेक नागरिक देवदर्शनासाठी विविध ठिकाणी जात असतात. नेमकी हीच संधी साधत आता अनेक इच्छुक उमेदवारांनी आपल्या भागातील मतदारांना विविध ठिकाणच्या देवदर्शनासाठी सहली आयोजित केल्या आहेत. त्यामुळे आता मतदारांना मोफतमध्ये देवदर्शन घडणार आहे. आगामी निवडणुका ह्या चुरशीच्या होण्याची शक्यता असून, लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीने घवघवीत यश मिळवले होते. तर विधानसभेमध्ये महायुतीने जोरदार मुसंडी मारली होती. त्यामुळे आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीसाठी दोन्ही बाजूनी मोठ्या प्रमाणावर तयारी सुरू केली असल्याचे दिसून येत आहे.

### पंचमीनिमित्त महिलांसाठी विविध उपक्रम

पवित्र श्रावण महिन्यातील नागपंचमी हा सण महिला वर्गातील मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. या सणाच्या निमित्ताने इच्छुक उमेदवारांकडून महिलांसाठी विविध ठिकाणी झोके तसेच विविध सार्वजनिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. मंगळागौर हा सण महिलांमध्ये विशेष लोकप्रिय असतो. या सणाचे औचित्य साधून इच्छुक उमेदवारांच्या पत्नीकडून विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

### नगरपरिषद निवडणुकीसाठी युवा उमेदवार सज्ज

आगामी नगरपरिषद निवडणुकीसाठी इच्छुक उमेदवारांमध्ये मोठ्या प्रमाणावर युवा उमेदवारांचा समावेश असणार आहे. प्रस्थापिथां बरोबरच युवा उमेदवार देखील मतदारांना आपलंसं करण्याचा प्रयत्न करताना दिसून येत आहेत.

### शिर्डी, परळी वैजनाथ,अष्टविनायक, उज्जैनचे दर्शन

इच्छुक उमेदवारांकडून श्रावण महिन्यात मतदारांना देवदर्शन घडवण्यात येत आहे. यामध्ये प्रामुख्याने शिर्डी, परळी वैजनाथ, अष्टविनायक, उज्जैन सह विविध ठिकाणच्या देवदर्शनाच्या सहली आयोजित करण्यात येत आहेत. खाजगी ट्रॅव्हल्स बुक करून एकाच वेळी पन्नास मतदारांना देवदर्शनासाठी पाठवले जात आहे.

# शिराढोण येथे आण्णाभाऊ साठे जयंती निमित्त विविध स्पर्धेचे आयोजन

आरंभ मराठी | शिराढोण

साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती निमित्त लहुजी ग्रुप, लहुजी नगर, शिराढोण यांच्या मार्फत जिल्हा परिषद प्रशाला शिराढोण शाळेमध्ये रविवारी (दि.२७) निबंध व वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.सुरुवातीला निबंध स्पर्धा घेण्यात आली. त्यानंतर लगेच वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेमध्ये शिराढोण गावातील इयत्ता पहिली ते दहावी पर्यंतचे ७० विद्यार्थी अतिशय उत्साहाने सहभागी झाले होते. या स्पर्धेसाठी लहान गट व मोठा गट असे दोन गट करण्यात आले होते. प्रत्येक गटातून दोन्ही स्पर्धेसाठी प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक काढण्यात आले. त्यांना रोख रक्कम अनुक्रमे ११०५, ७०५, ५०५ आणि स्मृतिचिन्ह व सहभागी सर्व विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात येणार आहेत. या दोन्ही स्पर्धेचे पारदर्शक नियोजन जि. प. प्रशाला शाळेतील शिक्षक संघशील रोडे यांनी केले.या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून चंद्रकांत महाजन, महेश सहाणे व किरण नाईकवाडे यांनी काम पाहिले. सदरील स्पर्धेचे बक्षीस वितरण साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती दिवशी १ ऑगस्ट रोजी करण्यात येणार आहे. या स्पर्धा दरम्यान उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना राहुल पाटील, झेलम शिंपले यांनी बिस्किटे वाटप केली. या स्पर्धेचे आयोजन लहुजी ग्रुप चे प्रमुख दीपक सहाणे , पप्पू साठे ,अमोल नरसिंगे, संजय थोरात ,गोरख कांबळे, दादा साठे लखन सहाने, महेश सहाने, बालाजी ताटे, उमाकांत साठे, गोविंद वैरागे यांनी केले.

# नवोदय विद्यालयातील खेळाडूंची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड



आरंभ मराठी | तुळजापूर

नवोदय विद्यालय समिती विभाग, पुणे यांच्यामार्फत रिजनल स्तरीय ॲथलेटिक्स व सांघिक खेळांच्या स्पर्धेचे आयोजन जवाहर नवोदय विद्यालय बडोदा व जवाहर नवोदय विद्यालय राजकोट गुजरात येथे करण्यात आले होते. यामध्ये जवाहर नवोदय विद्यालय तुळजापूर येथील खेळाडूंनी वेगवेगळ्या गटांमध्ये अनेक खेळामध्ये सहभाग घेतला होता. या स्पर्धा वेगवेगळ्या गटांमध्ये मुली व मुले यांच्यामध्ये होत्या. या पुणे रिजनमध्ये महाराष्ट्र ,गुजरात, गोवा, दिव ,दमण येथील खेळाडूंचा समावेश होता. या नॅशनल लेवल स्पर्धेतून राष्ट्रीय स्पर्धेसाठी अनेक खेळाडूंची निवड झाली आहे. या स्पर्धा आगामी काळात उत्तर प्रदेश मधील लखनऊ व गुजरात मधील राजकोट येथे होणार आहेत. या राष्ट्रीय स्पर्धे साठी कुमारी शुभांगी कोळी भालाफेक व नारायण उपासे लांब उडी अथलेटिक्स साठी तर सार्थक घुगे व शुभम हजारे यांची सांघिक खेळ हॉलीबॉल स्पर्धेसाठी निवड झाली आहे .या सर्व विद्यार्थ्यांचे विद्यालयाचे प्राचार्य के वाय इंगळे व उप प्राचार्य डी व्ही बडे यांनी अभिनंदन करून या सर्व खेळाडूंचा सत्कार केला.तसेच या विद्यार्थ्यांचे विद्यालयाचे चेअरमन, धाराशिव जिल्ह्याचे जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी अभिनंदन करून खेळाडूंना पुढील राष्ट्रीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी विद्यालयाचे वरिष्ठ अध्यापक एस डी खोब्रागडे, सांस्कृतिक कार्यक्रम प्रभारी हरी जाधव, श्रीमती एस आर कराड, विद्यार्थी, शिक्षक वृंद उपस्थित होते. या विद्यार्थ्यांचे पालक, शिक्षक संघाचे सर्व सदस्य यांनीही कौतुक करून अभिनंदन केले. या खेळाडूंना विद्यालयाचे क्रीडा अध्यापक सनी जाधव व क्रीडाध्यापिका प्रियंका लवटे यांनी विशेष मार्गदर्शन लाभले.

# देशातील पहिल्या टेक्निकल टेक्सटाईल प्रकल्पाच्या पायाभूत कामांना गती

### एमआयडीसीच्या माध्यमातून २५ हजार रोजगार निर्मितीचे उद्दिष्ट : आमदार राणा पाटील यांच्याकडून आढावा बैठक

आरंभ मराठी | धाराशिव

देशातील पहिल्या टेक्निकल टेक्सटाईल प्रकल्पाच्या पायाभूत कामांना आता गती आली आहे.सरकारने अंतर्गत रस्ते, वीज, पाणीपुरवठा कामांसाठी दिलेल्या १७ कोटींच्या निधीतून पायाभूत सुविधा उभारल्या जात आहेत. कौडगावसह जिल्ह्यातील वडगाव, होर्टी येथील एमआयडीच्या कामांनाही गती आल्याचे सांगून सर्व औद्योगिक वसाहतींच्या माध्यमातून २५ हजार रोजगार निर्मितीचे आपले उद्दीष्ट असल्याचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी म्हटले आहे.जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात ' मित्र'चे उपाध्यक्ष तथा आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या उपस्थितीत वेगवेगळ्या औद्योगिक वसाहतीच्या कामांचा आढावा घेण्यासाठी विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.



बैठकीत होर्टी, वडगाव, कौडगाव, वाशी, शिराढोण येथील एमआयडीसीमध्ये सुरू असलेल्या एकूण परिस्थितीचा आढावा घेण्यात आला. होर्टी येथे २०.२० हेक्टर क्षेत्र एमआयडीसीच्या ताब्यात आले आहे. त्याव्यतिरिक्त आणखी काही जागा त्या परिसरात उपलब्ध होऊ शकेल काय ? याबाबत तेथील उपविभागीय अधिकाऱ्यांना आढावा घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. आणखी जागा उपलब्ध झाल्यास त्या ठिकाणी एक विस्तृत आणि व्यापक एमआयडीसी उभारली जाणार आहे. जेणेकरून त्या परिसरातील स्थानिक युवकांना त्याच परिसरात हक्काचा रोजगार उपलब्ध होणार आहे. सोलापूर-धुळे या राष्ट्रीय महामार्गावर असलेल्या वडगाव येथे ८०.४६ हेक्टर जमीन सध्या एमआयडीसीच्या ताब्यात मिळाली आहे. तेथील लेआउटच्या नियोजनाचे कामही मंजूर करण्यात आलेले आहे. त्यानुसार आता वडगाव एमआयडीसीमध्ये आवश्यक असलेल्या पायाभूत सोयी सुविधांसाठी विकास कामे हाती घेतली जाणार आहेत, असे आमदार पाटील यांनी सांगितले.वाशी तालुक्यातील फटाका उद्योगांना अधिक सक्षम आणि रोजगारक्षम बनवण्यासाठी सुरू असलेल्या प्रयत्नांनाही आता यश आले आहे.

# कारगिल विजय दिनानिमित्त धाराशिव येथे शहीद जवानांना अभिवादन

आरंभ मराठी | धाराशिव

कारगिल युद्धाच्या २६ व्या वर्धापनदिनानिमित्त धाराशिव येथे 'कारगिल विजय दिवस' साजरा करण्यात आला. सन १९९९ मध्ये कारगिलमध्ये पाकिस्तानी घुसखोरांविरोधात शौर्याने लढून विजय मिळवणाऱ्या भारतीय जवानांच्या स्मृतीप्रित्यर्थ हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या निमित्ताने शहीद जवानांचे बलिदान स्मरून समाजात राष्ट्रनिष्ठेची भावना दृढ करण्याचा मनोदय व्यक्त करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्षपद कॅप्टन जे. एस.मेहता (निवृत्त), ऑफिसर इनचार्ज, ई.सी.एच.एस.धाराशिव यांनी भूषवले. यावेळी वीरनारी, माजी सैनिक, युद्धविधवा, शासकीय कर्मचारी तसेच इतर मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयात 'अमर जवान' स्मारक प्रतिकृतीस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. कॅप्टन मेहता आणि वीरपत्नी यांच्या हस्ते पुष्पचक्र अर्पण करण्यात आले. त्यानंतर इतर मान्यवर,माजी सैनिक आणि उपस्थित नागरिकांनीही पुष्पांजली वाहून आदरांजली अर्पण केली. कार्यक्रमात ५ वीरपत्नी/वीरमाता/वीरपिता, ३५ माजी सैनिक/माजी सैनिक विधवा व १३ शासकीय कार्यालयातील माजी सैनिकांचा सत्कार करण्यात आला.त्यांना शाल, श्रीफळ व गुलाबपुष्प देऊन गौरवण्यात आले.

# तुळजापुरातील मंकावती गल्लीतील पेव्हर ब्लॉक काढण्यास सुरुवात

### दैनिक आरंभ मराठीच्या वृत्ताची दखल

आरंभ मराठी | तुळजापूर

तुळजापूर शहरातील मंकावती गल्ली येथे बसवण्यात आलेले पेव्हर ब्लॉक काढण्यास सुरुवात झाली असून यामुळे नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. याबाबतचे वृत्त दैनिक आरंभ मराठीमध्ये प्रकाशित झाले होते. त्याची दखल घेत प्रशासनाने हे पेव्हर ब्लॉक काढण्याचे आदेश दिले होते. शहरातील मंकावती गल्ली येथे काही वर्षांपूर्वी पेव्हर ब्लॉक बसवण्यात आले होते. मात्र, हे बसवताना व्यवस्थित न बसल्याने हे अनेक ठिकाणी लूज झाले होते. त्यामुळे त्यामध्ये पाणी साचून ते पाणी येता जाता नागरिकांच्या अंगावर उडत होते. तसेच अनेक नागरिक याला ठेच लागून जखमी होत होते. या भागात अनेक पुजाऱ्यांची घरे असल्याने मोठ्या प्रमाणावर भाविक ही या परिसरात येत होते. मात्र या पेव्हर ब्लॉकमुळे अनेकांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. याबाबत काही दिवसापूर्वी प्रशासनाने हे पेव्हर ब्लॉक काढायचे आदेश दिले होते. सोमवारी (दि.२८) प्रत्यक्षात पेव्हर ब्लॉक काढायचे काम सुरू झाले असून, यामुळे नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.


आरंभ मराठी

तुळजापूर शहरात पेव्हर ब्लॉक उखडल्याने नागरिकांचे हाल

अर्ज, विनंती करूनही पालिका प्रशासन कार्यवाही करेना

अनेकदा विनंती करूनही दखल घेतली नाही

ज्येष्ठ नागरिक व लहान मुलांना त्रास



# सांस्कृतिक कार्य विभागातर्फे सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांसाठी राज्यस्तरीय स्पर्धेचे आयोजन

## ५ लाख रुपयांचे प्रथम पारितोषिक

आरंभ मराठी | धाराशिव

पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, सांस्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या वतीने 'महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धा २०२५ चे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत नोंदणीकृत संस्था किंवा परवानाधारक सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे सहभागी होऊ शकतात. सदर स्पर्धेचा अर्ज पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबईच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेल्या ऑनलाईन पोर्टलद्वारेच २० जुलैपासून २० ऑगस्ट २०२५ पर्यंत स्वीकारण्यात येणार आहेत. अपूर्ण अर्ज रद्द ठरविण्यात येतील. ही स्पर्धा निःशुल्क असून सांस्कृतिक कार्यक्रम, सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन, संस्कृतीचे जतन व संवर्धन याकरिता राबविण्यात आलेले उपक्रम, गडकिल्ले यांचे जतन व संवर्धन, राष्ट्रीय व राज्य स्मारके, धार्मिक स्थळे यांविषयी जनजागृकता तसेच जतन व संवर्धन, विविध सामाजिक उपक्रम व कार्ये, पर्यावरणपूरक मूर्ती,पर्यावरणपूरक सजावट,ध्वनिप्रदूषण रहित वातावरण,गणेशभक्तासाठी केलेल्या सोयी सुविधा यांच्या आधारे केलेल्या कार्याचा गौरव व्हावा आणि असेच समाजाभिमुख उपक्रम अधिकाधिक घडावेत म्हणून प्रोत्साहनपर पुरस्कार देण्याचे शासनाचे उद्दिष्ट आहे. याच निकषांच्या आधारे स्पर्धेचे परीक्षण केले जाईल.२७ ऑगस्टपासून सुरू होणाऱ्या गणेशोत्सवात सर्व जिल्ह्यांच्या जिल्हाधिकारी कार्यालयांनी 'गठीत केलेली जिल्हास्तरीय समिती या स्पर्धेत सहभागी मंडळे किंवा संस्थांच्या उत्सवस्थळाला भेट देतील आणि जिल्हास्तरीय परीक्षण पूर्ण करतील. मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे आणि पुणे हे ४ जिल्हे प्रत्येकी ३ आणि हे ४ जिल्हे वगळता अन्य ३२ अशा प्रत्येक जिल्ह्यातून एक यानुसार एकूण ४४ शिफारसी राज्यस्तरीय परीक्षणासाठी स्वीकारल्या जातील. स्पर्धेच्या अधिक माहितीसाठी सर्वांनी आपापल्या जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा. राज्यस्तरीय परीक्षणात प्रथम तीन विजेत्यांना अनुक्रमे ५ लाख, २.५ लाख आणि १ लाख 'रुपयांचे पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात येणार आहे. तसेच अन्य जिल्हास्तरीय प्रथम विजेत्यांना २५ हजार रुपयांचे पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात येणार आहे.या स्पर्धेत अधिकाधिक संख्येने सहभाग नोंदवण्याचे आवाहन सांस्कृतिक विभागाकडून करण्यात आले आहे.

# शिवसैनिकांनी आगामी निवडणुकांसाठी सज्ज राहावे, माजी आमदार राजन साळवी यांचे उमरग्यात आवाहन

### उमरगा-लोहारा तालुक्यात शिवसैनिकांची बैठक;संघटन बळकटीसाठी शाखा पुनरुज्जीवनावर भर

आरंभ मराठी | उमरगा

राज्यात लवकरच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होणार असून, या निवडणुका कार्यकर्त्यांसाठी अत्यंत महत्त्वाच्या ठरणार आहेत. या निवडणुकांसाठी शिवसैनिकांनी गाफील न राहता पूर्ण तयारीसह सज्ज राहावे, असे आवाहन शिवसेना समन्वयक तथा माजी आमदार राजन साळवी यांनी केले. सोमवारी (दि.२८ जुलै) उमरगा शहरातील श्री मंगल कार्यालय येथे उमरगा-लोहारा तालुक्यातील शिवसेना पदाधिकाऱ्यांची बैठक पार पडली. यावेळी डॉ.साळवी बोलत होते. या बैठकीत माजी खासदार प्रा. रविंद्र गायकवाड, शिवसेना उपनेते तथा माजी आमदार ज्ञानराज चौगुले, युवा सेना विभागीय निरीक्षक किरण गायकवाड, जिल्हा प्रमुख मोहन पणुरे, युवती सेना निरीक्षक ॲड. आकांक्षा चौगुले, सहसंपर्कप्रमुख भगवान देवकाते, सिद्रामप्पा चिंचोळे आदींची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना त्यांनी सांगितले की, धाराशिव जिल्हा हा शिवसेनेचा पारंपरिक बालेकिल्ला असून, मागील निवडणुकीत गाफीलपणामुळे काठावर पराभव पत्करावा लागला.आता प्रत्येक पदाधिकाऱ्याने आणि शिवसैनिकाने गावोगावी शाखा पुनर्जिवित करून संघटन बळकट करण्यासाठी कामाला लागावे. यावेळी प्रा.रविंद्र गायकवाड, ज्ञानराज चौगुले, किरण गायकवाड यांचीही भाषणे झाली. कार्यक्रमादरम्यान भगवान देवकाते यांची धाराशिव जिल्हा सहसंपर्कप्रमुख पदी, तर डॉ. फरीद अत्तार यांची शिवसेना डॉक्टर सेलचे मराठवाडा विस्तारक व उमरगा तालुकाप्रमुख पदी नियुक्ती झाल्याने मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.बैठकीस उमरगा तालुका प्रमुख बळीराम सुरवसे, लोहारा तालुका प्रमुख जगन्नाथ पाटील, शहरप्रमुख योगेश तपसाळे, युवा सेना जिल्हाप्रमुख सचिन जाधव, भगत माळी, तालुकाप्रमुख विनोद कोराळे, बलभीम येवते, विलास भगत, अमर शिंदे, सुभाष येळीकर, तुकाराम उपासे, प्रताप लोभे, दीपक रोडगे, अभिमान खराडे, चंद्रशेखर मुदकण्णा, राजेंद्र शिंदे, सुरेश मंगरूळे, नरेंद्र माने, घनश्याम चिंचोळे, सारिकाताई कांबळे, संध्याताई शिंदे, लताताई भोसले, संदीप चौगुले, पप्पु समन, विजय माने, विजय भोसले, अमोल पाटील, नामदेव लोभे, बसवराज शिंदे, अरुण जगताप, विजय भोसले, धोंडीराम पवार, शरद पवार, संतोष सगर, हरिदास भोसले, बालाजी बनसोडे, भरत कलबुर्गे, ज्ञानेश्वर पाटील, शिवराज चिनगुंडे, अमोल सोमवंशी, संजय रणखांब, काशिनाथ पाटील, नामदेव पवार, बालाजी जाधव, सुरेश दंडगुले यांच्यासह इतर अनेक शिवसेना पदाधिकारी व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन मनोज जाधव यांनी केले तर आभार प्रदर्शन चंद्रशेखर सूर्यवंशी यांनी मानले.











# शेतरस्त्याअभावी कसई येथील शेतकऱ्यांचे हाल; चिखलातूनच काढावी लागतेय वाट



### शेतमाल आणण्यासाठी कसरत

माझी दहा एकर शेती आहे, मात्र शेतरस्त्याअभावी शेतात जाण्यासाठी मोठ्या अडचणीला सामोरे जावे लागत आहे. तसेच वाहनेही शेतापर्यंत जात नसल्याने अनेकदा खांद्यावर वाहून शेतमाल बाहेर घ्यावा लागतो.

**योगेश घोंगते**
शेतकरी, कसई.

### प्रशासनाने तत्काळ दखल घ्यावी

शेतात जाण्यासाठी मजबूत शेतरस्ता नसल्याने अनेकदा शेतीचे नुकसान होत आहे. पावसाळ्यात पाणी वाढल्यानंतर धोकादायक पद्धतीने शेतात जावे लागत आहे. प्रशासनाने याची दाखल घेऊन तात्काळ हा शेतरस्ता करावा ही आमची मागणी आहे.

**रमेश कामटे**
शेतकरी, कसई.

आरंभ मराठी | तुळजापूर

तुळजापूर तालुक्यातील कसई येथे शेतात जाण्यासाठी मजबूत शेतरस्ता नसल्याने येथील दीडशे ते दोनशे शेतकऱ्यांना मोठ्या समस्येला तोंड द्यावे लागत आहे. त्यामुळे त्यांचे मोठे नुकसान आहे होत आहे. याबाबत प्रशासनाकडे मागणी करूनही शेतरस्ता केला नसल्याने अनेक शेतकऱ्यांना आपल्या जमिनी पडीक ठेवण्याची वेळ आली आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, तालुक्यातील कसई गावात शेतकऱ्यांना जाण्यासाठी मजबूत शेतरस्ता नसल्याने मोठ्या अडचणीला सामोरे जावे लागत आहे. या भागातील १५० ते २०० शेतकऱ्यांना शेतात जाण्यासाठी चिखलातून तसेच पाण्यातून वाट काढत जावे लागत आहे. पेरणी तसेच काढणीच्या वेळेस त्यांना मोठ्या समस्येला तोंड द्यावे लागत असून, त्यामुळे त्यांच्या शेतीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे. याबाबत शेतकऱ्यांनी आमदार, खासदार, तहसीलदार यांच्याकडे निवेदने दिली आहेत, मात्र अद्यापही हा शेतरस्ता बनत नसल्याने शेतकऱ्यांचे हाल सुरूच आहेत. त्यामुळे तात्काळ हा शेतरस्ता तयार करून शेतकऱ्यांची समस्या दूर करण्याची मागणी शेतकऱ्यातून होत आहे.